७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. १४ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## शिष्यवृत्तीच्या वितरणाला पगारापेक्षा जास्त प्राधान्य

मुंबई (दै. संध्या) : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. मुलींना 100 टक्के शिक्षण शुल्क माफ आणि मुलांना 50 टक्के शिक्षण शुल्क माफीचा लाभ देण्यात येत आहे. या निर्णयाविरोधात जी महाविद्यालये शुल्क आकारतील त्या महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येईल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानसभेत स्पष्ट केले. प्रलंबित शुल्क प्रतिपूर्ती आणि शिष्यवृत्ती वितरणातील अडचणींबाबत समाजवादी पार्टीचे विधानसभा सदस्य रईस शेख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांसाठी अनेक वेळखाऊ बाबी होत्या त्यांची सुलभता केली. शिष्यवृत्ती अर्जातील माहितीची संख्या 138 वरून 66 पर्यंत कमी करण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे 17 वरून 8 वर आणली आहेत. आता सीईटी डेटा थेट वापरला जाणार असल्याने विद्यार्थ्यांना वारंवार जात प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत.

# महाराष्ट्रात मराठी शिकवावीच लागणार

## मराठी न शिकवणाऱ्या शाळांना प्रथम समज अन् नंतर मान्यता रद्दची कारवाई, दादा भुसे यांची घोषणा

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांना प्रथम समज देण्यात येईल. त्यानंतर त्यांच्यावर थेट मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत केली.

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार हारून खान यांनी प्रश्नोत्तराच्या तासात राज्यातील सर्वच माध्यमांच्या शाळांत मराठी भाषा शिकवणे सक्तीचे करण्यासंबंधी प्रश्न उपस्थित केला. मराठीच्या मुद्यावर गत वर्षभरात अनेक आंदोलने झाली. पण मुंबईसह महाराष्ट्रात



अशा अनेक शाळा आहेत, जिथे अद्यापही मराठी भाषा सक्तीची अंमलबजावणी करण्यात येत नाही, असे ते म्हणाले. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी याची गंभीर दखल घेत या शाळांना प्रथम समज देण्यात येईल आणि त्यानंतर त्यांच्यावर थेट मान्यता रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केले.

दादा भुसे म्हणाले, राज्यातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा शिकवणे बंधनकारक आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांची कोणतीही गय केली जाणार नाही. आगामी शैक्षणिक वर्षात अशा शाळांची पुन्हा तपासणी करण्यात येईल. त्यांना पहिल्यांदा मराठी शिकवण्याची समज देण्यात येईल. पण त्यानंतरही या शाळांमध्ये मराठी शिकवण्यात आली नाही, तर त्या शाळांची किंवा संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल. यापुढे हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजरात व इतर भाषांच्या शाळांमध्ये मराठी अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी सरकार योग्य ती काळजी घेईल, असे ते म्हणाले.

तत्पूर्वी, काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनीही या चर्चेत सहभाग घेतला. महाराष्ट्रात सर्व माध्यमांच्या आणि सर्व बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची आहे असे सांगितले जाते. पण वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. महाराष्ट्रात CBSE, ICSE आणि IB बोर्डाच्या तसेच, इंग्रजी, हिंदी, उर्दू, गुजराती, कानडी व इतर प्रांतातील भाषेच्या माध्यमांच्या अशा अनेक शाळा आहेत. तिथे मराठी भाषा शिकवली जात नाही, ही वस्तुस्थिती शासनाने मान्य करावी. किमान आगामी वर्षापासून तरी महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत मराठी भाषा अनिवार्य असल्याचा जो कायदा आहे त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे ते म्हणाले.

अमित देशमुख यांनी मागच्या आठवड्यात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून सभागृहात सदरील मागणी केली होती. आज पुन्हा एकदा ती मागणी करत असल्याचे सांगून सरकार हा विषय गांभीर्याने घेईल अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर या प्रश्नावरील चर्चेचा समारोप करताना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आगामी वर्षात सदरील कायदा प्रभावीपणे राबवला जाईल, असे आश्वासन दिले.

खासगी पूर्व-प्राथमिक शाळांची पोर्टलवर अनिवार्य नोंदणी, नियमन, व गुणवत्ता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने अधिनियम आणण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली. राज्यातील खासगी पूर्व-प्राथमिक शाळांची नोंदणी पोर्टलवर अनिवार्य करण्याबाबत सदस्य मनीषा चौधरी यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत सदस्य विक्रम पाचपुते, प्रवीण दटके, योगेश सागर आणि अभिमन्यू पवार यांनी सहभाग घेतला. यावेळी मंत्री भुसे म्हणाले की, पूर्व-प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी केंद्रांची माहिती राज्य, जिल्हा प्रशासन आणि पालकांना एकत्रित स्वरूपात उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावरील प्री-स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर नोंदणी करणे 24 एप्रिल 2025 च्या शासन परिपत्रकाद्वारे बंधनकारक करण्यात आले आहे.

**ढिंग-टांग**




**ब्रेकिंग न्यूज**

## एलपीजी टंचाईवर सरकार खोटं बोलत असल्याचा आरोप

मुंबई (दै. संध्या) : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी देशातील एलपीजी गॅसच्या उपलब्धतेवरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. केंद्र सरकार देशात स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी गॅसची कोणतीही कमतरता नसल्याचा दावा करत असताना प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचा आरोप त्यांनी केला. दिल्लीमध्ये माध्यमांशी संवाद साधताना राऊत म्हणाले की, सरकार लोकांची दिशाभूल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी देशात गॅसची टंचाई नसल्याचे सांगत आहेत, मात्र अनेक राज्यांमध्ये नागरिकांना गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. संजय राऊत यांनी सांगितले की बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये प्रत्यक्ष परिस्थिती गंभीर आहे. अनेक ठिकाणी लोकांना गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका करत म्हटले की, कदाचित तुम्हाला अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प किंवा इस्रायल येथून गॅस मिळत असेल, पण देशातील सामान्य नागरिक आणि हॉटेल व्यावसायिक मात्र मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या परिस्थितीकडे केंद्र सरकारने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. हवे असल्यास उद्योगपतींनी त्यांची गुंतवणूक मोदी गटर गॅसवर करावी, असा खोचक टोला देखील त्यांनी लगावला.

## भारत ऊर्जा क्षेत्रात सक्षम : नरेंद्र मोदी

नवी दिल्ली (दै. संध्या) : पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळं जगभरात तेल आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम होत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. आसाममधील एका कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, भारत केवळ स्वतःच्या नव्हे तर जगाच्या ऊर्जा गरजांचीही काळजी घेऊ शकतो. याचवेळी त्यांनी काँग्रेसवर अफवा पसरवल्याचा आरोप करत तीव्र टीकाही केली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, "पूर्वी जगात कुठेही युद्ध किंवा संकट निर्माण झालं की त्याचा परिणाम पुरवठ्यावर होत असायचा आणि आपले शेतकरी संकटात सापडायचे. कधी खतांच्या किमती वाढत, तर कधी डिझेल आणि इंधन महाग होत असे. या स्थितीला काँग्रेस कारणीभूत होतं. काँग्रेस सरकारच्या काळात भारत अनेक बाबतीत परदेशांवर अवलंबून होता, त्यामुळे शेतीचा खर्च वाढत असे. मात्र गेल्या दशकात भाजप-एनडीए सरकारनं आत्मनिर्भरतेवर भर देत ऊर्जा क्षेत्रात मोठं काम केलं." मोदी म्हणाले की, "गेल्या दशकभरात भाजप सरकारनं देशातील रिफायनरी आणि ऊर्जा पायाभूत सुविधांच्या विकासावर मोठ्या प्रमाणात काम केलं. यामुळं आज भारत ऊर्जा उत्पादन आणि पुरवठ्याच्या बाबतीत मजबूत देशांपैकी एक बनला आहे. भारत स्वतःच्या गरजा भागवण्यासोबतच जागतिक ऊर्जा बाजारातही महत्त्वाची भूमिका बजावू शकतो."

## पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्णपणे कॉम्प्रोमाइज झालेत

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**

इराण-अमेरिका व इस्राइल युद्ध सुरू आहे. या युद्धाच्या झळा भारतालाही काही प्रमाणात बसत असल्याचे दिसत आहे. या मुद्द्यावरून विरोधकांनी संसदेत सरकारची चांगलीच गोची केली आहे. एपस्टीन फाइलवरून देखील कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेत मोदींवर टीका केली आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत कॉंग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ होते. तसेच आम आदमी पक्षाचे प्रतिनिधी होते व काही



डाव्या पक्षांचे प्रतिनिधी होते. आता आम्ही 23 तारखेला आरएसएसच्या कार्यालयावर मोर्चा आयोजित केला असल्याची माहिती दिली. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, स्वातंत्र्याच्या लढ्यात आरएसएसची कोणतीही भूमिका नव्हती. तो सामाजिक लढा असेल किंवा राजकीय असेल.

## धक्कादायक : चालकाचं नियंत्रण सुटल्यानं वाहनानं महिलेला उडवलं

**वाशिम (दै. संध्या)**

■ दोन मुली थोडक्यात बचावल्या, घटना CCTV मध्ये कैद

वाशिमच्या लाखी इथं भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. बोलेरो पीकअप वरील नियंत्रण सुटल्यानं एका महिलेला उडवले आहे. तर दोन मुली थोडक्यात बचावल्या आहेत. या संपूर्ण घटनेचा थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअपचा चालक दारुच्या नशेत गाडी चालवत होता अशी माहिती मिळाली आहे. वाशिमच्या लाखी इथं भरधाव वेगाने येणाऱ्या बोलेरो पिकअप गाडीचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला बसलेल्या एका महिलेला धडक देत त्या महिलेला उडवल्याची घटना घडली



आहे. दरम्यान, त्याच महिलेच्या बाजूला असलेल्या दोन मुली पैकी एक मुलगी थोडक्यात बचावली आहे. या भीषण अपघाताचा प्रसंग एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. बोलेरो पिकअपचा चालक दारुच्या नशेत गाडी चालवत होता अशी माहिती मिळत आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेऊन जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. तर दोन शाळकरी मुली सुदैवाने या अपघातातून बचावल्या आहेत. नाशिकच्या पुणे रोडवर शिंदे टोल नाक्यावर एसटी महामंडळाच्या बसला आग लागल्याची घटना घडली आहे. शहरातील शिंदे टोल नाका परिसरात बसला आग लागल्याने खळबळ उडाली आहे. बसमध्ये 16 प्रवासी होते. मात्र आगीची माहिती मिळताच बस ड्रायव्हरने सर्व प्रवाशांना खाली उतरवले. ड्रायव्हरच्या दक्षतेमुळं मोठा अनर्थ टळला आहे. आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. सोलापूर-नाशिक बसमध्ये 15 प्रवासी होते. सगळे प्रवाशी सुखरुप असल्याची माहिती मिळाली आहे. तर ही बस जळून खाक झाली आहे.

## मासिक पाळीत पगारी रजेची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

### *कायदा झाल्यास महिलांना कोणी काम देणार नाही, सरकारने धोरण बनवण्याचा विचार करावा*

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी देशभरातील विद्यार्थिनी आणि नोकरदार महिलांना मासिक पाळीदरम्यान सशुल्क रजा देण्याच्या मागणीवरील याचिकेवर सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, अशा याचिका नकळतपणे महिलांबद्दलच्या रूढीवादी कल्पनांना अधिक बळकट करू शकतात. सरन्यायाधीश म्हणाले - या याचिका भीती निर्माण करण्यासाठी, महिलांना कमी लेखण्यासाठी, मासिक पाळी ही त्यांच्यासोबत घडणारी वाईट गोष्ट आहे हे दर्शवण्यासाठी दाखल केल्या जातात. हा त्यांचा सकारात्मक हक्क आहे, पण त्या नियोक्त्याचा विचार करा ज्याला सशुल्क रजा द्यावी



लागेल. न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि सरन्यायाधीशांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान मासिक पाळीच्या रजेला अनिवार्य करण्याच्या संभाव्य सामाजिक परिणामांबद्दल चिंता व्यक्त केली. त्याचबरोबर याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या अधिकार क्षेत्रावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, या प्रकरणी स्वतः कोणतीही महिला न्यायालयात आलेली नाही.

सशुल्क मासिक पाळी रजेचा मुद्दा घेऊन शैलेंद्र मणि तिसऱ्यांदा याचिका घेऊन सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. पहिल्या याचिकेचा निपटारा फेब्रुवारी २०२३ मध्ये करण्यात आला होता, ज्यात याचिकाकर्त्याला केंद्रीय महिला व बाल मंत्रालयासमोर आपली बाजू मांडण्याची परवानगी देण्यात आली होती.

**सशुल्क मासिक पाळीच्या रजेवर टिप्पण्या**

- समजा तुम्ही संपूर्ण खाजगी क्षेत्राला महिन्यातून एकदा सुट्टी घेण्याचा अधिकार दिला, तर ते त्यांच्या विकासासाठी हानिकारक ठरू शकते. कार्यस्थळी निर्माण होणाऱ्या मानसिकतेची तुम्हाला कल्पना नाही.
- यावर कायदा झाल्यास, महिलांच्या करिअरला होणाऱ्या नुकसानीचा अंदाज लावणे कठीण होईल. कुणीही त्यांना जबाबदाऱ्या देणार नाही, अगदी न्यायिक सेवेतही, त्यांना सामान्य खटले सोपवले जाणार नाहीत.
- आम्ही निर्देश देतो की सक्षम प्राधिकरणाने सर्वोच्च न्यायालयाच्या 24 फेब्रुवारी 2023 आणि 8 जुलै 2024 च्या आदेशांद्वारे दिलेल्या निर्देशांचा विचार करावा आणि एक धोरण तयार करावे.

## नमाजला जाताना २१ जणांनी भरलेला पिकअप टेम्पो उलटला, एकाचा मृत्यू

**रायगड (दै. संध्या)**

जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात भीषण रस्ते अपघाताची घटना समोर आली आहे. नमाज अदा करण्यासाठी जात असताना 21 जणांना घेऊन जाणारा पिकअप टेम्पो पलटी झाल्यामुळे एक जण जागीच मृत्यूमुखी पडला, तर 20 जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. हा अपघात अलिबाग तालुक्यातील बोरघर पुलाजवळ घडला असून त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, गेल कंपनीमध्ये काम करणारे काही कामगार नमाज अदा करण्यासाठी अलिबाग तालुक्यातील रामराज येथे जात होते. यावेळी त्यांना घेऊन जाणारा पिकअप टेम्पो अचानक चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळं रस्त्यावर




पलटी झाला. या वाहनात एकूण 21 जण प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. या भीषण अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर इतर 20 जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू केलं. जखमींना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं असून काही जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे.

## लग्नाला नकार का देतेस ? असे म्हणून युवकाचा विद्यार्थिनीवर कोयत्याने हल्ला !

**घटनेनंतर फरार युवकाची गळफास घेऊन आत्महत्या**

**जुन्नर (दै. संध्या)**

बारव (जुन्नर) येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनी बुधवारी सकाळी नऊच्या सुमारास कॉलेजला जाण्यासाठी वसतिगृहाबाहेर पडली व सरकारी ग्रामीण रुग्णालयामागील पत्र्याच्या शेडजवळ ती आली असता, आरोपी महेश डामसे याने तिला रस्त्यात अडवून, 'लग्नाला नकार का देतेस ?' असे म्हणून तिच्या डोक्यावर व चेहऱ्यावर कोयत्याने वार केले. तरुणीने बचावासाठी डोक्यावर हात आडवा धरला असता तिच्या हातालाही गंभीर दुखापत झाली.विद्यार्थिनी गंभीर जखमी झालेली असून, तिच्यावर खाजगी रुग्णालत उपचार चालू आहेत.या प्रकरणी महेश मुरलीधर डामसे (वय २०, रा. आंबे, ता. जुन्नर) याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारानंतर आरोपी, घटनास्थळावरून फरार झाला होता स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग आणि जुन्नर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज त्पासून त्याचा शोध सुरू केला. त्याच्या दुचाकीचे लोकेशन गणेशखिंड घाट उतरताना




'क्षणभर विश्रांती' हॉटेलजवळ काही वेळ दिसले. मात्र, त्यानंतर दुचाकी दिसून न आल्याने पोलिसांनी सुमारे पाच ते सहा किलोमीटर डोंगर परिसरात शोधमोहीम राबवली.या शोधादरम्यान एका ठिकाणी आरोपीची दुचाकी गुरुवारी आढळली. तेथून काही अंतरावरच झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह सापडला. युवतीवर हल्ला केल्यानंतर आरोपीने तेथून पळ काढून आत्महत्या केल्याचा प्राथमिक निष्कर्ष पोलिसांनी काढला आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलिस कर्मचारी दीपक साबळे, अक्षय नवले, संदीप वारे तसेच जुन्नरचे पोलिस निरीक्षक किरण अवचर आणि त्यांच्या पथकाने सहभाग घेतला. सहायक पोलिस निरीक्षक अरविंद गटकळ अधिक तपास करीत आहेत. बारव पाडळी येथे आदिवासी विकास विभागाच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव प्रकल्पांतर्गत आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. या वसतिगृहात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी निवासी राहून शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेतात.या घटनेमुळे शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थिनीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासकीय वसतिगृहांमधील विद्यार्थिनीच्या सुरक्षेचे तीन तेरा वाजले असल्याची संतप्त प्रतिक्रिया पालकांमधून व्यक्त केली जात आहे. यापुढील काळात अशा घटना घडू नये, यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पाडळी बारवचे ग्रापंचायत सदस्य राजेश कारभळ यांनी केली. शासनाच्या आदिवासी विकास विभागाने आदिवासी समाजातील विद्यार्थिनींना माध्यमिक, महाविद्यालयीन तसेच तंत्र व उच्च शिक्षण घेता यावे यासाठी बारव पाडळी येथे अद्ययावत व सर्व सुविधायुक्त सुसज्ज वसतिगृहाची उभारणी अंदाजे तीन वर्षापूर्वी केली आहे. या वसतिगृहात इयत्ता आठवी ते पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या जवळपास चारशेहून अधिक विद्यार्थिनी निवासी राहत असून,या विद्यार्थिनी शिक्षणासाठी जुन्नर शहरातील शाळा व महाविद्यालयात जातात. वसतिगृहापासून शाळा महाविद्यालयांचे अंतर जवळपास दीड ते दोन किलोमीटर एवढे आहे. या विद्यार्थिनींना एवढे अंतर पायी कापावे लागते. वसतिगृह इमारतीच्या परिसरात पुरेशी मानवी वस्ती देखील नाही. मुळातच एवढ्या लांब अंतरावर वसतिगृह असल्याने पालकांमधून देखील तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## संपादकीय

# ॲक्टिव्ह युथनेशिया आणि पॅसिव्ह युथनेशिया

युथनेशिया म्हणजे इच्छामरण किंवा दयामरण होय. एखाद्या व्यक्तीला प्रकृती अस्वास्थ्यामुळे सहन कराव्या लागणाऱ्या तीव्र वेदनांमधून तिची सुटका करण्यासाठी तिला जाणीवपूर्वक मृत्यू देणे, तिचे जीवन संपविणे म्हणजे युथनेशिया. ग्रीक भाषेतील 'यू' अर्थात चांगला आणि 'थानातोस' म्हणजे मृत्यू या दोन शब्दांच्या मिश्रणातून युथनेशिया हा शब्द तयार झाला आहे. एखाद्या व्यक्तीला असाध्य आजाराने ग्रासले असेल, त्याच्या आजारावर उपलब्ध असलेले सगळे उपचार करून झाले असतील आणि ती व्यक्ती बरी होऊन पूर्ववत निरोगी आयुष्य जगू शकेल अशी शक्यता नसेल तर अशावेळी त्या रुग्णाची वेदनांमधून सुटका करण्यासाठी इच्छामरण मिळावे अशी अपेक्षा केली जाते. अर्थात गेली अनेक वर्षे इच्छामरणाला कायदेशीर परवानगी असावी म्हणून जगभरातील कार्यकर्ते लढा देत आहेत. असं असलं तरी मेडिकल एथिक्स, मानवता अशा अनेक मुद्द्यांवर अजूनही इच्छामरण समाजमान्य नाही. इच्छामरण आणि दयामरणाचे प्रामुख्याने दोन प्रकार मानले जातात. ॲक्टिव्ह आणि पॅसिव्ह म्हणजेच सक्रिय आणि निष्क्रिय. सक्रिय दयामरणामध्ये रुग्णाच्या वेदना संपवण्यासाठी त्याचा मृत्यू होईल अशी थेट कृती केली जाते. या प्रकारामध्ये डॉक्टर त्या रुग्णाला एखाद्या प्राणघातक औषधाच्या जास्त प्रमाणातील डोसचे इंजेक्शन देतात. थोडक्यात त्या रुग्णाचा जाणीवपूर्वक मृत्यू घडवून आणला जातो. त्यामुळेच हा युथनेशिया किंवा अशा प्रकारचे दयामरण वादग्रस्त ठरते. जगभरातील अनेक देशांमध्ये त्यावर कायदेशीर प्रतिबंध आहे. काही देशांमध्ये मात्र कठोर नियमांचे पालन करून, असे दयामरण देण्यास परवानगी आहे. याउलट निष्क्रिय किंवा पॅसिव्ह युथनेशिया हा प्रकार आहे. या प्रकारामध्ये रुग्णाला जिवंत ठेवणारे उपचार एक तर थांबविले जातात किंवा तसे उपचार सुरू करणेच टाळले जाते. त्यामुळे त्या रुग्णाला नैसर्गिकपणेच मृत्यू येतो. उदाहरणार्थ, एखाद्या रुग्णाला व्हेंटिलेटर लावण्याची किंवा फीडिंग ट्यूब देणे, जाणूनबुजून रुग्णाला जिवंत ठेवणारी औषधं देणे या गोष्टी बंद करणे किंवा त्या सुरूच न करणे हा निष्क्रिय युथनेशिया मानला जातो. या प्रकारात रुग्णाला विशिष्ट उपचार न मिळाल्यामुळे पुढे जाऊन त्याचा मृत्यू होणारच आहे हे गृहित धरले जाते. उपचारांमुळे त्याला वेदना होणार असतील तर त्या टाळणे असाही या प्रकाराचा उद्देश असतो. सहसा रुग्णाच्या इच्छेनुसार किंवा त्याच्या जवळच्या



कुटुंबाच्या संमतीने हे करणे योग्य समजले जाते. नुकताच सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निकाल देत १३ वर्षांपासून कोमात असलेल्या हरीश राणा या तरुणाचा व्हेंटिलेटर काढण्यास परवानगी दिली. हरीश सध्या ३२ वर्षांचा आहे. १३ वर्षांपूर्वी एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून तो पडला. तेव्हापासून तो कोमात आहे. त्याच्या या अवस्थेला वैद्यकीय परिभाषेत इररिव्हर्सिबल पर्मनंट व्हेजिटेटिव्ह स्टेट असे म्हटले जाते. अशा रुग्णाचे व्हेंटिलेटर काढण्यास परवानगी देणारा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अशा प्रकारचा हा पहिलाच निकाल आहे. हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने सन्मानाने मरण्याच्या मूलभूत अधिकाराचा आधार घेतला आहे, मात्र असे असले तरी दयामरण योग्य की अयोग्य, नैतिक की अनैतिक याबाबत समाजात असलेले मतप्रवाह टोकाचे आहेत. रुग्ण हक्क, मानवता या दृष्टीनेही त्याबाबत विचार केला जातो. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालामुळे हे चित्र काहीसे बदलण्याची शक्यता आहे.

## गुरु वचन

### जीवनाचे चार आधार

सुसंस्कारितेचे चार आधार आहेत– समजुतदारपणा, प्रामाणिकपणा, जबाबदारपणा आणि शूरपणा. यांना आध्याात्मिक–आंतरिक वरिष्ठतेच्या दृष्टीत तेवढेच महत्वाचे मानले गेले पाहिजे जेवढे शरीरासाठी अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा अनिवार्य समजले जाते. समजुतदारपणाचा अर्थ असा की, दूरदर्शी विवेकशीलता अवलंबिणे. एरवी लोक तात्पुरत्या फायद्यालाच सर्वस्व मानतात. तो मिळविण्यासाठी चुकीचे पाउलही उचलतात. त्यामुळे भविष्य अंधकारमय बनते.

गुन्हेगारी घटक याच मनोवृत्तीचे असतात.दूरदर्शिता, विवेकशीलता अनुभवी शेतकऱ्याच्या कामासारखे आहे. ज्यानुसार शेत नांगरणे, बीज पेरणे, खत पाणी देणे, देखभाल करण्यात सुरूवातीचे नुकसान आणि कष्ट सहन केले जातात. दूरदर्शिता सांगते की, याचे फळ काळानुसार मिळणार आहे.

एका बीजाच्या दाण्याच्या बदल्यात अनेक पट दाणे मिळणार आहेत. संयम आणि सत्कार्य अशीच बुद्धिमत्ता आहे. पुण्य परमार्थात भविष्य उज्वल बनविणारी शक्यता अंतर्भूत असते. संयमाचे फळ वैभव आणि पौरुषाच्या रूपात दृष्टिगत होणार असते. दूर्बिणच्या आधारे दूरपर्यंतची वस्तु पाहिली जाऊ शकते आणि त्या माहिती आधारे अधिक बुद्धिमत्तापूर्ण निर्णय घेतला जाऊ शकतो. अध्यात्माच्या भाषेत यालाच तृतीय नेत्र खुलणे म्हणतात. त्या आधारे संकटापासून वाचणे आणि उज्वल भविष्याची निर्मिती शक्य आहे.

कथनी–करनी एक ठेवणे यास प्रामाणिकपणा म्हणतात. सहयोग व सद्भाव अर्जित करण्यासाठी प्रामाणिमपणा प्रमुख आधार आहे. याला आपल्या व्यवसायात स्वीकारून अनेक लोकांनी मोठे यश मिळविले आहे. मोठी जबाबदारी उपलब्ध करणे आणि ती पार पाडण्यात प्रामाणिकपणा यश देतो.

सुसंस्कारितेचा तिसरा भाग आहे जबाबदारी. बेजबाबदार उत्तरदायित्वापासून निर्लज्जतापूर्वक इंकार करू शकतात. मात्र जबाबदार लोकांना आपले उत्तरदायित्व नियमबद्धपणे पार पाडता येते. जो आरोग्य सुरक्षित ठेवण्याचा जीवन संपदेचा श्रेष्ठतम सदुपयोग करण्याचा, लोक परलोक उत्कृष्ट बनविण्याची जबाबदारी पार पाडतो, तोच संतोष, यश आरोग्याचा लाभ प्राप्त करू शकतो. चौथा व अंतिम टप्पा आहे– शूरपणा. दैनिक जीवनात अनेकानेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी साहस आवश्यक आहे. अन्यथा गडबडीत योग्य उपाय सुचणार नाही.

## उपदेशकथा

### यातना

अब्राहम लिंकन यांच्या जीवनातील कथा. एकदा ते सिनेटच्या बैठकीला निघाले होते. वाटेत त्यांनी पाहिले की, रस्त्याकडेच्या एका खड्ड्यातील चिखलात एक डुक्कर अडकले होते. त्यातून बाहेर पडण्यासाठी ते केविलवाणी धडपड करत होते. पण होत होते मात्र उलटेच. अखेर लिंकन तेथे गेले. त्यांनी त्या डुकराला चिखलातून बाहेर काढले. या प्रयत्नात त्यांच्या कपड्यांना खूपच चिखल लागला पण ते बदलण्यास वेळ लाग़ेल म्हणून अखेर ते तसेच बैठकीला गेले. कपडे खराब का? हे इतर सदस्यांनी विचारण्यापूर्वीच त्यांनी सर्व प्रकार सांगितला. सगळे सदस्य त्यांच्या भूतदयेबद्दल कौतुक करू लागले. ते थांबवत लिंकन म्हणाले, 'तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. त्या डुकरावर दया दाखवण्यासाठी मी हे सारं केलेलंच नाही. त्याची केविलवाणी धडपड मला पाहवेना. माझ्या मनाला खूप यातना होऊ लागल्या. माझ्या हृदयातील कालवाकालव दूर व्हावी म्हणून मी हे सारं केलं. यात मदत झाली असेल तर ती मलाच झाली आहे.'

कथा उपदेश : दुसऱ्याच्या यातना कमी केल्याने मनाला समाधान लाभते.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:दशमी ०८:११:१२ |
| १४ मार्च २०२६ | नक्षत्र:उत्तराषाढा |
| शनिवार | २८:४८:५५+ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:वारीयन १०:४२:०२ |
| फाल्गुन शके | करण:विष्टि ०८:११:१२ |
| संवत्– १९४७ | करण:बव २०:४८:५६ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | सूर्य:कुम्भ |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:मकर०९:३२:४५ |
| मास– फाल्गुन | हिजरी सन् – १४४६ |
| ऋतु– सौर वसंत | मुस्लिम मास – रमजान |
| कृष्ण पक्ष | तारीख – २४ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | 5 | 7 | | 1 | |
| 8 | | | 1 | 9 | | 6 | | 5 |
| 1 | 4 | | 6 | | | | | |
| | | 9 | 8 | | | 5 | | 4 |
| | | | | | | | | |
| 5 | | 3 | | | 1 | 9 | | |
| | | | | | 5 | | 4 | 2 |
| 9 | | 1 | | 2 | 8 | | | 7 |
| | 2 | | 7 | 6 | | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८८५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 1 | 3 | 6 | 9 | 7 | 4 | 5 |
| 5 | 6 | 3 | 4 | 1 | 7 | 2 | 8 | 9 |
| 7 | 4 | 9 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 3 |
| 4 | 3 | 5 | 1 | 2 | 6 | 8 | 9 | 7 |
| 1 | 7 | 8 | 9 | 3 | 4 | 5 | 2 | 6 |
| 6 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 4 | 3 | 1 |
| 2 | 8 | 6 | 5 | 9 | 1 | 3 | 7 | 4 |
| 3 | 5 | 7 | 6 | 4 | 8 | 9 | 1 | 2 |
| 9 | 1 | 4 | 2 | 7 | 3 | 6 | 5 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९२५ – अटलांटिक पार ऐकू जाईल, असा पहिला नभोवणी कार्यक्रम प्रक्षेपित झाला.
- १९४२ – अमेरिकन सैन्याची पहिली तुकडी ऑस्ट्रेलियात दाखल.
- १९५३ – निकिला खुशचेव्ह यांची सोविएत रशियाच्या साम्यवादी पक्षाचे पहिले सचिव म्हणून नेमणूक.
- २००२ – संयुक्त राष्ट्र संघाने १०४ भारतीय सैनिकांना शांती फौजात सहभागी असताना केलेल्या कार्याबद्दल मरणोत्तर डाग हॅमशूल्ड पुरस्काराने सन्मानित केले.
- २००४ – रशियाच्या अध्यक्षपदी ब्लादिमीर पुतीन यांची फेरनिवड.

### राष्ट्रीय

- १९६२ – गोव्याला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देणारे विधेयक संसदेत मंजूर.
- २००८ : सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या उत्तर भारतीयांविरोधातील आंदोलनाला सणसणीत चपराक देणारा निर्णय दिला. देशातील कोणत्याही नागरिकाला देशाच्या कुठेही स्थायिक होण्याचा अधिकार असल्याचे न्यायालयाने नमूद केले.


### जन्म

- १८७९ – अल्बर्ट आइन्स्टाईन यांचा जन्म.
- १९३३ – मायकेल केन या हॉलीवूड गाजवणाऱ्या ब्रिटीश अभिनेत्याचा जन्म.
- १९६५ – आमेर खान या बॉलीवूड चित्रपट अभिनेत्याचा जन्म.

### निधन

- १९१७ – वॉल्टर केन या इंग्रज चित्रकाराचे निधन.
- १९३२ – कोडॅक कॅमेऱ्याचे जनक आणि कोडॅक इस्टमन कंपनीचे संस्थापक जॉर्ज इस्टमन यांचे निधन.

### : SMS :



Teacher: A for?

Sardar: Apple

Teacher: Jor se bolo?

Sardar: Jay mata di.

### हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.५ | २४.५ |
| अहमदनगर | ३३.८ | २३.७ |
| अकोला | ३६.८ | २५.८ |
| अमरावती | ३६.१ | २७.१ |
| बीड | ३९.२ | २८.८ |
| भंडारा | ३६.६ | २२.६ |
| बुलढाणा | ३३.२ | २१.८ |
| चंद्रपूर | ३८ | ३०.१ |
| चेन्नई | ३७.७ | २७.४ |
| नवी दिल्ली | ३३.५ | २३ |
| धुळे | ३५.४ | २५.४ |
| गोंदिया | ३५.१ | २६.२ |
| जळगाव | ३७.५ | २४.१ |
| कोल्हापूर | ३४.१ | २५.३ |
| लातूर | ३४.३ | २६.३ |
| मुंबई | ३७ | २७.५ |
| नागपूर | ३६.३ | २६.९ |
| नांदेड | ३६.८ | २९.३ |
| नंदूरबार | ३४.२ | २४.५ |
| नाशिक | ३४.६ | २५ |
| पुणे | ३३.५ | २४.८ |
| पंढरपूर | ३५.४ | २६ |
| सातारा | ३५ | २३.१ |
| सांगली | ३५.२ | २६.७ |
| सोलापूर | ३५.६ | २७.९ |
| वर्धा | ३७.९ | २८.२ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर कर्तव्य श्रेष्ठ असते हे लक्षात ठेवा. भावनेच्या आहारी जाऊन कोणतेही निर्णय घेऊ नका.

**तुळ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पश्चिम आर्थिक यशासाठी फार मोठा झगडा द्यावा लागेल असे नाही. उधारी वसुली होईल.

**वृषभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण आर्थिकदृष्ट्या भरीव तरतूद करू शकाल. साहित्य क्षेत्रात नाव मोठे करता येईल.

**वृश्चिक :** शुभ दिशा:पश्चिम राजकीय, सामाजिक तसेच वैवाहिक जीवनाच्या आघाडीवर आपली वाटचाल आकर्षक आनंददायी राहील.

**मिथुन :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा :पश्चिम व्यापार–उद्योगात अपेक्षित व्यवहार होतील. आर्थिक स्थैर्यासाठी मोठे निर्णय घेतले जातील.

**धनु :** शुभ रंग:भूरा, शुभ दिशा:पश्चिम नोकरी–व्यवसायातून केलेले प्रयत्न कारणी लागतील. शेतीमध्ये केलेले नवे प्रयोग सत्कारणी लागतील.

**कर्क :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर कुटुंबात होणाऱ्या अनाठायी खर्चासाठी आपल्याला जबाबदार धरले जाईल.

**मकर :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: उत्तर युवकांनी आळस व चालढकल स्वत:चे नुकसान करेल हे विसरू नये.


**सिंह :** शुभ रंग : केसरी,शुभ दिशा:उत्तर कामाच्या ठिकाणी जास्तीचे काम वाढवू नका. मोठा धोका पत्करू नका. आरोग्य उत्तम राहील.

**कुंभ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण आर्थिक प्रकरणातून अपेक्षित लाभ पदरात पाडून घेता येतील. अनेक क्षेत्रात बौद्धिक चमक दाखवू शकाल.

**कन्या :** गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण व्यावसायिक गाठीभेटीतून एखादा मोठा निर्णय घेतला जाईल. मुलांचे प्रश्न सुटल्याचे समाधान मिळेल.

**मीन :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: उत्तर युवक–युवतींना प्रेमप्रकरणात अपेक्षित यश मिळेल. महिलांनी गप्पाष्टकात वेळ वाया घालू नये.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८६



### आडवे शब्द

१. गडवा
३. दरवर्षीनुसार
७. ज्ञानेश्वरांची प्रार्थना
१०. नाचक्की
१२. पोपट
१४. वर्तुळ
१६. बट्टा, कलंक
१७. कौशल्य
१९. शोक
२१. कडधान्याचा अंकुर
२१अ. हिंदीत शब्द, भाषा
२२. चुलती
२३. रामाचा एक भाऊ
२५. हत्ती
२६. अचानक बाहेर पडणारा पाण्याचा प्रवाह, पाण्याचा उगम
२७. जोराचा वारा
२८. इतर
२९. पिता
३१. कबूल
३३. मेंदू (हिंदी)
३४. गुंड
३५. अब्रू
३६. अनुमती
३८. पीकदाणी
४०. वितरण
४२. सूर्यापासून प्राप्त
४३. भस्म
४४. कफल्लक
४५. विष्णूचे एक नाव
४६. दासी
४७. लोकनाट्य
४९. प्रशंसा
५२. खोटारडा
५४. श्रीराम
५८. हिंदीत दोस्त
६०. शय्या
६१. शाबासकी, कौतुकाची –
६३. ओझे
६५. वालीचा मुलगा
६७. हे एक असेल तर दोन तलवारी कशा बसणार?
६८. दिवस वाईट आले की बुद्धीही फिरते याअर्थी म्हण– '----- विपरीत बुद्धी'
७१. ठिकाणा
७३. किनारा
७४. डौलदार
७७. भूमी
७९. न आवरता येणारा
८१. पक्ष्यांचा राजा
८२. उजळवर्णी
८३. आकाश
८५. यौवन
८६. क्रिडा
८८. समुद्र
८९. आश्चर्यचकित
९०. छंद
९१. अडचण

### उभे शब्द

१. लाल
२. पीडा
३. समाविष्ट, मिळालेला
४. शिल्लक
५. हिंदीत द्वारपाल, रखवालदार
६. कबूल
८. संचय
९. उदाहरण, दृष्टांत
११. अप्रीती
१३. लहर, तरंग
१५. पती, धनी
१७. खिसेकापू
१८. अधीन
१९. संकट
२०. पाऊस
२१. '--जो, जो रे'
२२अ. तुळशीचा रंग, गेरू
२४. कमतरता
२५. बोभाटा
२७. अश्व
२८. ज्याला कोणी शत्रू नाही असा
३०. अस्थिर
३१. रात्र
३२. पिता
३५. दुर्दशा, हेळसांड
३६. मृदंग
३७. परत परत
३९. च्या साठी
४१. स्नानाचे पाश्चात्त्य भांडे
४८. अजागळ
५०. दैवाने, नशिबाने प्राप्त
५१.'-- --' मोठेपण तया यातना कठीण'
५२. मनाई
५३. वडील
५५. घोट
५६. आवाज
५७. न बोलण्याचे व्रत
५९. जोर
६२. अकारण
६४. आई
६६. दहावी तिथी
६७. मांजराचा आवाज
६९. वर्ष, संवत्सर
७०. लहान मूल
७२. कापडी तंबू
७५. धावून येणाऱ्या सरीमुळे वाहून जाणारे मातींचे पात्र
७६. जसा
७७. किंचित
७८. गाव
८०. पावसाचा देव
८१. मोजदाद
८४. नाकातील खानदानी दागिना
८७. नम्र

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे श्लोक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

उभे उत्तर : १.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.श्लोक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ७५.नान ७६.यम ७८.विडा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.




# सात अभ्यासक्रमांचे तीन महिन्यांचे मोफत प्रशिक्षण

■ बार्टी व विज्ञान व तंत्रज्ञान उद्यानाच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ

पुणे (दै. संध्या) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि विज्ञान व तंत्रज्ञान उद्यान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम लक्ष्मीबाई भाऊराव पाटील इनोव्हेशन फाउंडेशन, एस. एम. जोशी महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला.

अनुसूचित जातींच्या बेरोजगार युवक-युवतींसाठी हा कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून तो पूर्णपणे मोफत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ग्राफिक डिझायनर, सोशल मीडिया एक्झिक्यूटिव्ह, आयटी हेल्पडेस्क अटेंडंट, जीएसटी असिस्टंट, सीनियर असोसिएट – डेस्कटॉप पब्लिशिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल मेंटेनन्स टेक्निशियन आणि ड्रोन सर्व्हिस टेक्निशियन अशा सात अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी तीन महिन्यांचा आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एकनाथ मुंढे, प्राचार्य, एस. एम. जोशी महाविद्यालय होते. प्रमुख अतिथी म्हणून सोनाली भट्टाचार्जी, प्रकल्प संचालिका, विज्ञान व तंत्रज्ञान उद्यान, पुणे उपस्थित होत्या. तसेच विशेष अतिथी म्हणून डॉ. संजय अहिवळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक, एस. एम. जोशी महाविद्यालय उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. एकनाथ मुंढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्य विकास महत्त्वाचा असून त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण होतात, असे सांगितले. तर सोनाली भट्टाचार्जी यांनी युवक सशक्तीकरणासाठी कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले आणि अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमाला अनिल करांडे, उपजिल्हाधिकारी तथा विभाग प्रमुख (कौशल्य विकास विभाग), बार्टी, पुणे, प्रज्ञा मोहिते, कार्यालय अधीक्षक, बार्टी, पुणे तसेच महेश गवई, प्रकल्प व्यवस्थापक, बार्टी, पुणे यांनी मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान व तंत्रज्ञान उद्यानचे प्रकल्प समन्वयक डॉ. मनोज कुलकर्णी यांनी केले. हा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यासाठी बार्टीचे महासंचालक तसेच विज्ञान व तंत्रज्ञान उद्यानचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. तर आभार प्रदर्शन विज्ञान व तंत्रज्ञान उद्यानचे प्रकल्प व्यवस्थापक वैभव निमगिरे यांनी केले.

# कराटे सरावादरम्यान झालेल्या दुखापतीमुळे वाचला जीव

## पुण्यातील १० वर्षांच्या मुलीच्या स्वादुपिंडातील दुर्मिळ गाठ यशस्वीरित्या काढली

■ पुण्यात मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथे स्वादुपिंडातील दुर्मिळ SPN गाठीवर भारतातील सर्वात कमी वयातील रुग्णांपैकी एका मुलीवर यशस्वी उपचार; उपचारानंतर मुलगी पुन्हा शाळेत.




पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलचे क्लस्टर डायरेक्टर श्री. आनंद मोटे म्हणाले, प्रगत कॅन्सर थेरपी, गॅस्ट्रोएण्टेरोलॉजी व पीडियाट्रिक सर्जरी करणाऱ्या आमच्या व्यावसायिकांची बहुआयामी टीम, तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान व आपलेपणाने आम्ही या सेवा देतो. मणिपाल हॉस्पिटल्समध्ये आम्ही विशेषत: आव्हानात्मक व दुर्मिळ केसेसमध्ये सुरक्षित, गुणकारी व रूग्ण-केंद्रित केअर देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. सर्जिकल ऑन्कोलॉजीचे डॉ. अमित पारसनीस, तसेच ॲनेस्थेसियोलॉजिस्ट डॉ. आशिष पाठक, पीडियाट्रिक इंटेन्सिव्हिस्ट डॉ. पूजा गिरे आणि बहुआयामी टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली.

पुणे (दै. संध्या) :

पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील कॅन्सर सर्जनांनी 10 वर्षांच्या मुलीच्या स्वादुपिंडातील दुर्मिळ गाठ यशस्वीरित्या काढून टाकली. या केससह भारतात स्वादुपिंडाच्या सॉलिड स्यूडोपापिलरी निओप्लाझम (एसपीएन) या आजाराने पीडत सर्वात कमी वयाच्या रूग्णाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, या गाठीची शरीरात कोणतीही लक्षणे दिसत नव्हती. पण, शाळेत कराटेच्या तासादरम्यान पोटाला झालेल्या दुखापतीमुळे या आजाराचे अनपेक्षितपणे निदान झाले. इमेजिंग आणि बायोप्सीसह तपासण्या केल्यानंतर सॉलिड स्यूडोपापिलरी निओप्लाझम (एसपीएन)चे निदान झाले. हा स्वादुपिंडाचा दुर्मिळ आणि कमी तीव्रतेचा कर्करोगजन्य ट्यूमर आहे, जो पूर्णपणे काढून टाकल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होण्याची शक्यता अत्यंत जास्त असते. एकूण स्वादुपिंडाच्या गाठींपैकी एसपीएनचे प्रमाण फक्त 1 ते 3 टक्के असते आणि दरवर्षी 10 लाख व्यक्तींपैकी एका व्यक्तीला हा आजार होतो. हा आजार प्रामुख्याने तरुण महिलांमध्ये, साधारणपणे किशोरवयीन ते 30 वर्षांच्या वयोगटात अधिक आढळतो, आणि लहान मुलांमध्ये या आजाराचे निदान होणे अत्यंत दुर्मिळ आहे. त्या मुलीमध्ये आजाराची कोणतीच लक्षणे दिसून येत नव्हती, तसेच ती नेहमीप्रमाणे शाळेत जात होती आणि दैनंदिन काम करत होती, ज्यामुळे या निदानामुळे तिच्या पालकांना मोठा धक्का बसला. शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबाने अनेक हॉस्पिटल्समध्ये डॉक्टरांचा सल्ला घेतला. या केसबाबत सांगताना बाणेरमधील मणिपाल हॉस्पिटलमधील सर्जिकल ऑन्कोलॉजीचे एचओडी व कन्सल्टण्ट डॉ. अमित पारसनीस म्हणाले , शस्त्रक्रियेदरम्यान स्वादुपिंडाच्या रचनेचे नीट निरीक्षण केल्यानंतर आम्ही सेंट्रल पॅनक्रिएटॉमी करण्याचा निर्णय घेतला. यामुळे आम्हाला ड्युओडेनम (लहान आतड्याचा सुरुवातीचा भाग) आणि स्वादुपिंडाचा काही भाग सुरक्षित राखता आला, तसेच व्हिपल प्रोसिजर सारखी मोठी व गुंतागुंतीची शस्त्रक्रिया टाळता आली. स्वादुपिंड हा अवयव शरीरातील महत्त्वाच्या रक्तवाहिन्यांच्या अगदी जवळ असतो आणि लहान मुलांना रक्ताचा जास्तीचा स्त्राव सहन होत नाही, त्यामुळे ही शस्त्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक होती. पण, आम्ही अत्यंत कमी रक्तस्त्रावात ही गाठ सुरक्षितपणे काढून टाकली आणि स्वादुपिंडाचे कार्य कायम ठेवले. रुग्ण मुलगी आता पूर्णपणे बरी झाली आहे, तसेच ती पुन्हा शाळेत जाऊ लागली आहे आणि पुन्हा दैनंदिन काम करू लागली आहे. ती आता सामान्य आयुष्य जगू शकेल, अशी आम्हाला खात्री आहे . स्वादुपिंडाच्या गाठी अनेकदा बराच काळ कोणतीही लक्षणे न दिसता शरीरात राहू शकतात आणि कधी-कधी इतर कारणांसाठी केलेल्या तपासणीमध्ये त्यांचे अनपेक्षितपणे निदान होते. अशा दुर्मिळ आजारांचे व्यवस्थापन करण्यासाठी, विशेषतः लहान मुलांच्या बाबतीत वेळेवर केलेली तपासणी आणि बहुआयामी टीमने केलेले उपचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

# आंबेडकर जयंतीदरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्या

## परशुराम वाडेकर यांची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

पुणे (दै. संध्या) :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या काळात समाजातील कार्यकर्त्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी अधिकृत पत्र पाठवून प्रशासनाला योग्य निर्देश देण्याची विनंती केली आहे.

वाडेकर यांनी आपल्या पत्रात म्हंटले आहे की, पुणे शहरात दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर समाजातील विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र काही वेळा उत्सवाच्या गर्दीमुळे किंवा परिस्थितीमुळे किरकोळ नियमभंग होतो आणि त्यावरून काही कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जातात.

इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये जसे की गणेशोत्सव किंवा इतर सार्वजनिक उत्सवांमध्ये दाखल झालेले गुन्हे शासनाकडून मागे घेण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर आंबेडकर जयंतीदरम्यान दाखल झालेले गुन्हेही तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी उपमहापौरांनी पत्राद्वारे केली आहे. याबाबत राज्य शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन प्रशासनाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

मागील काही वर्षांत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांवर अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले आहेत. समाजाच्या वतीने हे गुन्हे मागे घेण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. विशेष म्हणजे २०१६ ते २०२४ या कालावधीत दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

# ७५० किमी सायकल प्रवासातील ५५० किमी टप्पा पुण्यात

पुणे (दै. संध्या) :

■ फिटनेसप्रेमींशी कांथी दत्त यांचा संवाद




उद्योजक आणि अतिदीर्घ अंतर सायकलपटू कांथी दत्त यांनी हैदराबाद ते मुंबई सुरू असलेल्या ७५० किमी सायकल मोहिमेतील ५५० किमीचा महत्त्वाचा टप्पा बुधवारी पूर्ण केला. या निमित्ताने फिनिक्स मार्केटसिटी, पुणे येथे आयोजित विशेष आरोग्यसंवाद कार्यक्रमात पुण्यातील धावपटू, सायकलप्रेमी आणि आरोग्यप्रेमी सहभागी झाले.

ही सात दिवसांची सायकल मोहीम भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या सहकार्याने राबवली जात असून शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख आरोग्यसवयींना प्रोत्साहन देण्याचा तिचा उद्देश आहे. उद्योजक असतानाही आरोग्याला प्राधान्य देत कांथी दत्त सक्रिय जीवनशैलीचा संदेश देत आहेत आणि या मोहिमेद्वारे लोकांना नियमित हालचाल व आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याचे आवाहन करत आहेत.

या मोहिमेद्वारे 'भीतीवर मात' या उपक्रमाचीही सुरुवात करण्यात आली आहे. सहनशक्तीच्या क्रीडा प्रकारांच्या माध्यमातून मानसिक ताकद वाढवणे आणि स्वतःच्या मर्यादांवर मात करण्यासाठी लोकांना प्रेरित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

पुण्यातील या टप्प्यात शहरातील अनेक आरोग्यप्रेमी सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात मल्टिफिट पुणे यांच्या पथकाने घेतलेल्या उत्साही व्यायाम सत्राने झाली. अधिकृत आरोग्य सहकारी असलेल्या मल्टिफिट पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली तालबद्ध व्यायाम सत्रासह शरीरताठरता आव्हान आणि बैठक आव्हान यांसारख्या मजेशीर आरोग्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यात उपस्थितांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या प्रवासामागील उद्देश स्पष्ट करताना कांथी दत्त म्हणाले, "उद्योजकता आणि सहनशक्तीच्या क्रीडा प्रकारांमध्ये एक समान गोष्ट आहे ती म्हणजे सातत्य आणि मानसिक ताकद. या मोहिमेद्वारे लोकांनी आरोग्याकडे अल्पकालीन उद्दिष्ट म्हणून नव्हे तर दीर्घकालीन जीवनशैली म्हणून पाहावे, हा माझा प्रयत्न आहे."

अभिनेता अयान लल्ल यांनीही या कार्यक्रमात सहभागी होत तरुणांमध्ये नियमित व्यायाम आणि सक्रिय जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले.

"आरोग्य म्हणजे नेहमीच अत्यंत कठीण गोष्ट असते असे नाही. सायकल चालवणे, धावणे किंवा दररोज थोडी हालचाल करण्यापासूनही निरोगी जीवनशैली सुरू होऊ शकते," असे अयान लल्ल म्हणाले.

कार्यक्रमात कांथी दत्त आणि आहारतज्ज्ञ अमिता गद्रे यांच्यात सहनशक्तीच्या क्रीडेमध्ये योग्य आहार आणि विश्रांतीचे महत्त्व यावरही चर्चा झाली. पुण्यातील उद्योजिका देवयानी पवार याही या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नयनदीप रक्षित यांनी केले. प्रेक्षकांशी मुक्त संवाद आणि माध्यम प्रतिनिधींशी चर्चेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

पुण्यात ५५० किमीचा टप्पा पूर्ण केल्यानंतर कांथी दत्त आता मुंबईकडे अंतिम टप्प्यासाठी रवाना झाले आहेत. या उपक्रमाला सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत मायक्रोवेव्ह कम्युनिकेशन इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि साई सिल्क्स कलामंदिर लिमिटेड यांचा पाठिंबा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



# भक्तामर कलश तीर्थावर झाला दिगंबर जैन राष्ट्रसंतांचा दुर्मिळ समागम

■ भांडगाव पंचकल्याणक महोत्सवात भव्य शोभायात्रा; मंगलमय वातावरणात श्रावक- श्राविका मंत्रमुग्ध

पुणे (दैनिक संध्या) : यवतजवळील भांडगाव (ता. दौंड) येथील भक्तामर कलश तीर्थ येथे '१००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवा'स मोठ्या भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. या महोत्सवानिमित्त तीर्थस्थळी दिगंबर जैन राष्ट्रसंत, आचार्य, उपाध्याय तसेच साधू-साध्वींचा दुर्मिळ संतसमागम सुरू असून संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. गुरुवारी (दि.१२) जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त देवाच्या जन्माभिषेकाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी श्रावक-श्राविका मंगलमय वातावरणात मंत्रमुग्ध झाले होते. महोत्सवात पहाटे शांतिजाप व जिनदर्शन पार पडले. त्यानंतर जिनेंद्राभिषेक, शांतिधारा, नित्यपूजा आणि शांतिहवन करण्यात आले. सकाळी तीर्थंकर जिनबालक जन्मोत्सव सभा व संबंधित विधी संपन्न झाले. त्यानंतर प्रवचन सभेचे आयोजन करण्यात आले. शनिवार (दि.१४ मार्च) रोजी ४८,००० मीटर हस्तलिखित भक्तामर वस्त्रांची विशेष झांकी सादर केली जाणार आहे. या अनोख्या उपक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड तसेच लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.जन्मकल्याणकानिमित्त सकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये श्रावक-श्राविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या वेळी संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. दुपारी पांडुकशिलावर १००८ कलशांनी जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर जिनबालक श्रृंगार व नामकरण सोहळा पार पडला. सायंकाळी आचार्य संघांचे प्रवचन झाले. यानंतर गुरूभक्ती, आनंदयात्रा, आरती, शास्त्रस्वाध्याय, तांडव नृत्य, पाळणा व बालक्रीडा कार्यक्रम झाले. या सर्व कार्यक्रमांमुळे संपूर्ण तीर्थस्थळ परिसर भक्तिरसात चिंब झाला होता.

# कनिष्ठ अभियंत्यांच्या भरती रखडल्याने महापालिका 'टुलीप' इंटर्नशिपवर अवलंबून

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महापालिकेतील कनिष्ठ अभियंत्यांची भरती रखडलेली असताना "शहरी अध्ययन प्रशिक्षण कार्यक्रमा"च्या माध्यमातून २२५ अभियंत्यांची नियुक्ती केली जात आहे. या शिकावू अभियंत्यांकडून बांधकाम, पाणी पुरवठा, मलनिःसारण, पथ या महत्त्वाच्या विभागातील कामांना हातभार लागत आहे. पुणे महापालिकेत गेल्या अनेक वर्षापासून कनिष्ठ अभियंत्यांची भरती झालेली नव्हती. सेवेत असलेल्या अभियंत्यांची पदोन्नती झाल्यानंतर या रिक्त झालेल्या जागेवर नवीन अभियंते आले नाहीत. त्याच प्रमाणे सेवानिवृत्त होणाऱ्यांचे प्रमाण जास्त असताना त्या तुलनेत नवीन अभियंते महापालिकेत आले नाहीत.

# पद्मा फाउंडेशनतर्फे पारंपरिक वेशभूषेत दुचाकी रॅली, महिलांचा सन्मान

पुणे (दै. संध्या) :




"आजच्या काळात महिलांनी अनेक क्षेत्रांत आपली क्षमता सिद्ध केली आहे. महिलांना योग्य संधी, प्रोत्साहन आणि पाठबळ मिळाल्यास त्या समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. महिलांचे सक्षमीकरण हे केवळ महिलांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे," असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले.

जागतिक महिला दिनानिमित्त पद्मा फाउंडेशनच्या वतीने दुचाकी रॅलीचे, तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले होते. सिंहगड रस्त्यावरील मॉंटेरोसा सोसायटी क्लब हाऊसमध्ये आयोजित सोहळ्याप्रसंगी प्रेरक वक्ते डॉ. दत्ता कोहिनकर, सहायक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, आयआरएस डॉ. संदीप साठे, उद्योजक तुषार गोसावी, सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई, डॉ. राजेंद्र खेडेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक समीर गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम, संयोजक व पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे, संचालिका पुष्पा कांबळे यांच्यासह मॉंटेरोसा सोसायटीचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी फाउंडेशनच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

महिलांच्या सन्मानार्थ आयोजित दुचाकी रॅलीमध्ये विविध वेशभूषा करून महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रॅलीद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात शिक्षण, सामाजिक कार्य, उद्योग, आरोग्य, कला आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. पोलीस सेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल अनुजा देशमाने यांच्यासह माधुरी बर्वे व सुनीता डांगे (शिक्षण), वृषाली गोसावी (उद्योग व पर्यावरण), ऐश्वर्या थोरात (राजकारण), मनीषा खेडेकर (सामाजिक), ॲड. ऋतुजा चोरगे-साठे (वकिली), आर्या भागवत (क्रीडा) व आर्या पापळ (शिक्षण) यांना 'पद्मा सन्मान' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# गर्भाशयाच्या कर्करोगाच्या मोफत तपासणी शिबिरास प्रतिसाद

पुणे (दै. संध्या) :



जागतिक महिला दिनानिमित्त महानगर गॅस लिमिटेडच्या 'एमजीएल आरोग्य कार्यक्रम' या सीएसआर उपक्रमांतर्गत गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाच्या निदानासाठी मोफत एचपीव्ही डीएनए तपासणी शिबिर दापोली येथे पार पडले. महानगर गॅस लिमिटेड, सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क पुणे, तहसील कार्यालय दापोली आणि आयुजेन बायोसायन्सेस पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे आयोजन दापोलीच्या तहसीलदार तथा दंडाधिकारी श्रीमती अर्चना बोंबे यांनी केले होते. या वेळी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणेचे सहायक व्यवस्थापक वैभव निमगिरे तसेच आयुजेन बायोसायन्सेसचे मनीष पुंगलिया प्रमुख उपस्थित होते. शिबिरात आशा स्वयंसेविका तसेच स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांबू उद्योगाच्या प्रगतीसाठी सहकार क्षेत्राची जोड आवश्यक

## माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांचे मत; 'आयएमडीआर'तर्फे दोन दिवसीय बांबूकॉन प्रदर्शनाचा समारोप

पुणे (दै. संध्या) :



ग्रामीण अर्थव्यवस्थेत परिवर्तन करण्याची क्षमता असलेले बांबू हे जादुई पीक आहे. शाश्वत उद्योग म्हणून बांबूकडे पाहायला हवे. या उद्योगाला सहकार क्षेत्राची आणि संस्थात्मक धोरणाची जोड मिळाली, तर बांबू उद्योग झपाट्याने विकसित होईल," असे मत माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी व्यक्त केले. बांबूची लागवड वाढत असून, त्याला संस्थात्मक रूप दिल्यास बांबूच्या क्षमतेचा पूर्ण वापर होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्चच्या (आयएमडीआर) वतीने 'सहकार चळवळीत बांबू : शाश्वतता आणि समृद्धीची जडणघडण' तसेच 'डेटाच्या आधारे नेतृत्व : धोरणे, नवकल्पना आणि प्रभाव' या विषयांवर आंतरराष्ट्रीय परिषद आणि 'बांबूकॉन' प्रदर्शनाच्या समारोपावेळी सुरेश प्रभू बोलत होते. प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभू यांनी बांबू प्रदर्शनाला भेट देत उत्पादकांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

सुरेश प्रभू म्हणाले, "पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळात पर्यावरणमंत्री असताना बांबू लागवडीला १९९८मध्ये देशात पहिल्यांदाच चालना दिली. देशाचे पर्यावरण आणि अर्थव्यवस्था बदलण्याची क्षमता बांबूमध्ये आहे. भारतात ८०-९० टक्के लोक सहकाराशी संबंधित आहेत. सहकाराच्या अनेक यशोगाथा आहेत. महाराष्ट्रात सहकाराच्या माध्यमातून सामाजिक आर्थिक प्रगतीची अनेक उदाहरणे आहेत. महाराष्ट्रात ऊस शेतकऱ्यांना सहकारामुळे पैसा मिळू लागला. तसेच हिमाचल प्रदेशात सफरचंदाच्या बाबतीत झाले. अमूलसारखा ब्रँड निर्माण झाला. आता तर आईच्या दुधाची बँक तयार झाली आहे. सहकारातील चांगल्या उदाहरणांच्या धर्तीवर आता बांबूमध्येही चांगले प्रयोग करण्याचा विचार केला पाहिजे."

बांबू केवळ एक पीक नसून, तो भविष्यातील एक मोठा उद्योग असल्याचे सांगून प्रभू म्हणाले, "ग्रामीण भाग, तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात परिवर्तन घडवण्याची क्षमता सहकारात आहे. ऊसाचे माती आणि पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होतात, तर बांबूचे सकारात्मक परिणाम होतात. बांबूच्या वापरामुळे कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होते, त्यामुळे हरित अर्थव्यवस्था उभारणीतही बांबूचा हातभार लागतो. त्यामुळे बांबूसह शेतीविषयक उत्पदनांना सहकाराची जोड देणे गरजेचे आहे."

सहकारातून निर्माण होणारी संपत्ती सदस्यांच्या हाती जाते, हा सहकाराचा फायदा आहे. त्यामुळे सहकारी संस्थेच्या माध्यमातून उत्तम डिझाइन, उत्पादने बांबूपासून विकसित केल्यास त्याचे विपणन, विक्री, निर्यात करता येऊ शकते. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. सहकार क्षेत्र बांबूसाठी गेमचेंजर ठरू शकते, असा विश्वास प्रभू यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## यशवंतराव चव्हाण आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार - गोपाळदादा तिवारी

पुणे (दैनिक संध्या) : माजी उपपंतप्रधान, देशाचे संरक्षण, परराष्ट्र व गृहमंत्री स्व. 'वायबी' उर्फ यशवंतराव चव्हाण साहेबांच्या काळात महाराष्ट्राच्या विकासाची पाया भरणी झाल्याने चव्हाण साहेब 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' ठरल्याची स्तुती सुमने वहात काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी यांनी चव्हाण साहेबांना अभिवादनपर श्रद्धांजली वाहिली. राजीव गांधी स्मारक समिती'चे वतीने भोलाशेठ वांजळे यांनी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते, या प्रसंगी मंडईतील चव्हाण यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. गोपाळदादा तिवारी पुढे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कर्जाची क्षमता वाढली मात्र विद्यमान सरकार राज्यास कर्ज बाजारी करत असल्याची टिका ही त्यांनी केली. महाराष्ट्रात धरणे आणि सिंचन प्रकल्पांना चव्हाण साहेबांनी प्राधान्य दीले ज्यामुळे शेतीला पाणी मिळाले, उत्पादन वाढले आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली. जनी (सोलापूर) जायकवाडी (संभाजीनगर): येडगाव धरण (कुकडी प्रकल्प) पुणे जिल्हा): कुकडी सिंचन योजने सह मनिकडोह, दिंभे, वडज, पिंपळगाव जोगे इ धरणांच्या ऊभारणीत यांचा समावेश आहे. पंचायत राज व्यवस्था, सहकार चळवळ, शिक्षण व औद्योगिक विकासाची मुहूर्तमेढ त्यांचेच काळात झाली याचे स्मरण ठेवत स्व यशवंतरावजी चव्हाण साहेबांना आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी सर्वश्री नंदुशेठ पापळ, धनंजय भिलारे, कामगार नेते राजेंद्र खराडे, उदय लेले, हरी महाले, शिवाजी सावंत, गणेश बुचडे, शुभम पाटोळे, भाऊ शेडगे, ॲड. श्रीकांत पाटील इ उपस्थित होते.

## दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत एशियन कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स पुणे यांच्या सयुक्त विद्यमाने एशियन कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स सर्व्हे नं. २८/१५/१६, नऱ्हे धायरी रोड, पारी कंपनी चौक, धायरी येथे १७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये जिल्हयातील औद्योगिक परिसरातील २४ नामांकित उद्योजकांनी त्यांचा सहभाग दर्शविलेला असून, त्यांच्याकडून १९०० पेक्षा जास्त रिक्तपदे भरण्यात येणार आहेत. ही सर्व रिक्तपदे किमान १० वी, १२ वी, पदवीधर, डिप्लोमा अशा विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी असून पुणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक व बेरोजगार उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांबाबत अधिक माहिती करुन घेण्यासोबतच अर्ज करण्याकरिता www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. खाजगी क्षेत्रातील विविध रिक्त पदांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठी अधिकाधिक नोकरीइच्छुक रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून, आपला सहभाग नोंदवावा.

## संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक महिला आयोगाच्या परिषदेत

# पुण्याच्या वैद्य ईशानी बेंडाळे यांचा तिसऱ्यांदा सहभाग

**ऑक्सफर्ड विद्यापीठात उच्चशिक्षण घेणाऱ्या ईशानी मांडणार महिलांच्या न्याय व समानतेचे मुद्दे**



पुणे (दै. संध्या) :

न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक महिला आयोगाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी पुण्यातील वैद्य ईशानी बेंडाळे यांची निवड झाली आहे. जागतिक स्तरावरील या परिषदेत सहभागी झालेल्या वैद्य ईशानी यांच्यामुळे शहराचा सन्मान वाढला आहे. या परिषदेत त्या सलग तिसऱ्यांदा सहभागी होत आहेत. वैद्य बेंडाळे या भारतातील आरोग्य व्यवस्थेतील प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे महिलांचे आरोग्य,

> "संयुक्त राष्ट्रांच्या महिला आयोगाच्या वार्षिक परिषदेत तिसऱ्यांदा सहभागी होण्याची संधी मिळाल्याचा मला मोठा सन्मान वाटतो. भारतातील वैद्य किंवा आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून आरोग्य क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभवातून महिलांच्या आरोग्य, न्यायप्रवेश आणि समानतेशी संबंधित मुद्दे मांडण्याची संधी मिळत आहे. जागतिक स्तरावर स्त्री-पुरुष समानतेबाबत व्यापक संवाद घडवून आणणे आवश्यक आहे. धोरण, प्रत्यक्ष अनुभव आणि जागतिक सहकार्य यांना जोडणाऱ्या चर्चांमध्ये सहभागी होण्याची मी उत्सुक आहे."
> **- वैद्य ईशानी बेंडाळे, ऑक्सफर्ड स्कॉलर**

न्यायप्रवेश आणि समानतेशी संबंधित मुद्दे मांडणार आहेत.

महिलांच्या समानतेसाठी कार्य करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या महिला आयोगाची वार्षिक परिषद (यूएन सीएसडब्ल्यू७०) ९ ते १९ मार्च या कालावधीत न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात होत आहे. जगभरातील सरकारांचे प्रतिनिधी, धोरणकर्ते आणि नागरी संस्थांचे प्रतिनिधी यामध्ये सहभागी झाले आहेत. वैद्य बेंडाळे या मूळच्या पुण्यातील असून, त्यांनी टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून आयुर्वेद वैद्यकशास्त्रातील पदवी (बीएएमएस) पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी ब्रिटनमधील स्वानसी विद्यापीठातून नॅनोमेडिसिनमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले. सध्या त्या ऑक्सफर्ड विद्यापीठातून 'पुराव्यावर आधारित आरोग्यसेवा' या विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेत २०२३ मध्ये त्यांची ब्रिटिश सोसायटी फॉर नॅनोमेडिसिन संस्थेच्या 'चॅम्पियन' म्हणून निवड झाली आहे. मागील वर्षी, त्यांनी ऑक्सफर्ड युनियन या प्रतिष्ठित संस्थेत 'पाश्चिमात्य स्त्रीवाद आणि ग्लोबल साऊथ' या विषयावरील चर्चासत्राचे संचालन केले होते.

## यशवंतरावांच्या दूरदृष्टीने मराठी नाटकांना करमणूक कर नाही

पुणे (दै. संध्या) :

- ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांचे प्रतिपादन
- यशवंतराव चव्हाण कला साहित्य पुरस्कार सोहळा साजरा
- प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगा लॉज मित्र मंडळाच्या वतीने सलग ४० वर्षे कविसंमेलन व पुरस्काराचे आयोजन



"ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत मराठी नाटकांवर करमणूक कर आकारला जाणार नाही, असा निर्णय घेतला होता. त्यांच्या या दूरदर्शी निर्णयाचे फायदे आजतागायत मराठी नाट्यसृष्टीला मिळत आहेत. कलासक्त यशवंतरावांचे हे द्रष्टेपण लक्षणीय होते," असे प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते सतीश आळेकर यांनी केले. सलग ४० वर्षे कविसंमेलन घेण्याचा वारसा ढेरे कुटुंबाने जपला आहे, हे दिलासादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. महेश कोठारे यांनी लोकप्रिय चित्रपट दिले. अनेक कलाकारांना स्टार करण्यात योगदान दिले. मराठी चित्रपटात नवे तांत्रिक व अद्भुताचे गारूड त्यांनी प्रथम निर्माण केले. त्यांचे सुपुत्र आदिनाथसोबत काम करण्याचा अनुभव घेतल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. स्वर्गीय प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगा लॉज मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४० वे कवी संमेलन व यशवंतराव चव्हाण कला साहित्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. या समारंभात ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते महेश कोठारे यांना 'यशवंतराव चव्हाण कला जीवनगौरव पुरस्कार', तर रानमाणूस प्रसाद गावडे यांना 'अजितदादा सामाजिक कार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आले. प्रत्येकी ५१ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप होते. या दोन पुरस्कारांसह 'यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार' बुलढाणा येथील प्रेषित प्रदीप सिद्धभट्टी (काव्यसंग्रह-विस्मरणाच्या आरण्यात), चंद्रपूर येथील अविनाश पोईनकर (दंडकारूण्य) व नाशिक येथील प्रतिभा पवार-खैरनार (कवितासंग्रह - वंशावळीच्या प्राचीन सरीतून) यांना प्रदान करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रोख ११,००१ व सन्मानचिन्ह असे होते.

## डीआरआरएनपदी ॲड. सत्यजित कराळे पाटील यांची निवड

पुणे (दै. संध्या) :



रोटरॅक्ट डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या डिस्ट्रिक्ट रोटरॅक्ट रिप्रेझेंटेटिव्ह नॉमिनी (डीआरआरएन) या पदावर ॲड. सत्यजित शिवाजीराव कराळे पाटील यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीने युवक नेतृत्व आणि सेवा उपक्रमांना त्यांच्या कार्यकाळात नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. व्यवसायाने वकील असलेले कराळे पाटील यांनी फौजदारी, सायबर तसेच एनडीपीएस कायद्यात विशेष प्राविण्य मिळविले आहे. व्यावसायिक कामकाजाबरोबरच सामाजिक कार्य आणि युवक नेतृत्व घडविण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. कराळे पाटील यांनी २०१५ साली रोटरॅक्ट क्लब ऑफ मराठवाडा मित्र मंडळ, पुणे कोथरूड या क्लबचे चार्टर मेंबर म्हणून रोटरॅक्टमध्ये प्रवेश केला. सेवाभावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास पुढील दशकभरात विविध नेतृत्वाच्या जबाबदाऱ्यांमधून अधिक व्यापक झाला. रोटरॅक्टमधील कार्यकाळात त्यांनी क्लबपासून जिल्हास्तरापर्यंत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. २०१९-२० या वर्षात क्लबचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांच्या नेतृत्वाखाली १३७ हून अधिक सेवा प्रकल्प राबविण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत २९ मार्च रोजी मूल्यमापन चाचणी

पुणे (दै. संध्या) :



केंद्र शासन पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ मध्ये उल्लास ॲपवर नोंदणी झालेल्या असाक्षरांची, पूर्वीच्या परीक्षेस उपस्थित राहू न शकलेल्या व कामगिरीत सुधारणा आवश्यक शेरा प्राप्त असाक्षरांची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी रविवार २९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑफलाईन पद्धतीने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये घेण्यात येणार आहे.

राज्यात अंदाजे ३ लाख असाक्षरांची चाचणी घेण्याबाबत जिल्ह्यांना सूचित करण्यात आले आहे. या परीक्षेतील प्रश्नपत्रिका ही पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याच्याशी संबंधित असून तीन भागांमध्ये विभागलेली एकूण १५० गुणांची असणार आहे. यामध्ये अनुक्रमे वाचन ५० गुण, लेखन ५० गुण, संख्याज्ञान ५० गुणांची परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागासाठी ३३ टक्के (१६.५ गुण) अनिवार्य आहेत व एकूण १५० गुणांपैकी ३३ टक्के (४९.५ गुण) अनिवार्य असतील. कोणत्याही एका भागाचे ३३ टक्के गुण होण्यासाठी कमी पडलेले जास्तीत जास्त ५ वाढीव गुण देता येतील. परंतु तीनही भागाचे मिळून ५ पेक्षा जास्त ग्रेस गुण देता येणार नाहीत. परीक्षेस जाताना एक आयकार्ड आकाराचे छायाचित्र, जन्मतारखेचा पुरावा म्हणून मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुक आदींपैकी कोणतेही एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी ३ तासांचा असेल. दिव्यांगांसाठी ६० मिनीटांची अधिकची वेळ असेल.

ही चाचणी परीक्षा मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तेलगू, तामीळ, बंगाली इत्यादी माध्यमातून होणार आहे. उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी फक्त काळ्या अथवा निळ्या शाईचा बॉलपेन वापरावा. उल्लास ॲपवर नोंदणीकृत असाक्षर व्यक्ती परीक्षेसाठी पात्र असेल. नोंदणी न केलेल्या असाक्षरांसाठी परीक्षा केंद्रावर नोंदणीची व्यवस्था करण्यात येणार आहे.

असाक्षर व्यक्तींनी निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर २९ मार्च रोजी ओळखपत्रासह उपस्थित रहावे. नोंदणीकृत असाक्षर व्यक्तींना परीक्षा केंद्रावर उपस्थित ठेवण्यासाठी शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, केंद्रप्रमुख, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, स्वयंसेवक यांनी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत, असे आवाहन शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (योजना) कृष्णकुमार पाटील यांनी केले आहे.

## पवन तलाव मैदानाच्या विकासासाठी रु. १ कोटी १४ लाख मंजूर

चिपळूण (दै. संध्या) :



■ आमदार शेखर निकम यांच्या प्रयत्नांना यश

चिपळूण शहरातील क्रीडाप्रेमी युवकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. आमदार शेखर निकम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळत पवन तलाव येथील खेळाचे मैदान विकसित करण्यासाठी रु. १ कोटी १४ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून गेली अनेक वर्ष पडून असलेल्या इमारतीचे होणार सुशोभीकरण मैदानाचा सर्वांगीण विकास करताना कॉमेन्ट्री बॉक्स तसेच इनडोअर स्टेडियमचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यामुळे चिपळूणमधील क्रीडापटूंना सराव आणि स्पर्धांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध होणार असून स्थानिक क्रीडा संस्कृतीला मोठी चालना मिळणार आहे. आमदार शेखर निकम यांच्या या प्रयत्नांमुळे चिपळूणच्या क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा आणि दिशा मिळणार असल्याची भावना क्रीडाप्रेमी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.


फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे-४१२३०८
ई-मेल: fursungi.urulidevachinp2024@gmail.com
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

फुरसुंगी- उरुळी देवाची नगरपरिषद कार्यालयात विविध विभागातूल दिले जाणारे ना-हरकत दाखले, उतारे यांचे सन २०२६-२७ करिता फी चे दर

| अ.क्र. | सेवेचे नाव | सन २०२६-२७ करिता प्रस्तावित शुल्क |
|---|---|---|
| ०१. | जन्म प्रमाणपत्र | रु.१००/- |
| ०२. | मृत्यू प्रमाणपत्र | रु.१००/- |
| ०३. | जन्म मृत्यू नोंदणी विलंब आकार | २१ दिवसापर्यंत रु.०/-<br>२१ ते ३० दिवसापर्यंत रु.१०/-<br>३० ते १८० दिवसापर्यंत रु.५०/-<br>१८० दिवसानंतर रु.१००/- |
| ०४. | विवाह नोंदणी अर्ज | रु.१००/- |
| ०५. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र | रु.२५०/-(६ महिन्याच्या आत)<br>रु.५०/-(प्रतिवर्ष दंड) |
| ०६. | १. ८अ उतारा<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. होर्डिंग्ज / बॅनर परवानगी शुल्क | रु.१००/- प्रति उतारा<br>प्रति अर्ज रु.५०/-<br>रु.५०/- चौ.फुट १ वर्ष |
| ०७. | मालमत्ता हस्तांतरण फॉर्म | रु.१००/- |
| ०८. | मालमत्ता हस्तांतरण<br>१. मालमत्ता हस्तांतरण शुल्क वारसा हक्कानुसार व गिफ्ट डीडसाठी | निवासी- रु.१०००/-<br>व्यावसायिक रु.२०००/- |
| | २. खरेदीखत | निवासी खरेदीखत किमतीवर ०.२५%<br>व्यावसायिक खरेदीवर किमतीवर ०.५०% |
| ०९. | दैनंदिन बाजार फी | रु.२०/- |
| १०. | आठवडे बाजार फी | १ चौ.मी. रु.२०/- २ चौ.मी.रु.४०<br>३ चौ.मी.रु.६०/- त्यापुढे रु.१००/- |
| ११. | नगरपरिषदकडून देण्यात येणारे विविध ना हरकत दाखले | वाणिज्यव्यतिरिक्त रु.५००/-<br>वाणिज्य व व्यवसायिक रु.१०००/- |
| १२. | परवाना रद्द करणे | रु.२००/- |
| १३. | परवाना दुय्यम प्रत | रु.२००/- |
| १४. | नगरपरिषद हद्दीबाहेर अग्नीशमन वाहन भाडे | पहिल्या ३ तासासाठी रु. ५०००/-<br>व पुढील प्रत्येक तासासाठी रु. १०००/- |
| १५. | नळकनेक्शन बिलावरील नावात बदल अर्ज<br>नळकनेक्शन वापरातील प्रकार बदलणे अर्ज<br>नळकनेक्शन ट्रान्सफर/दुरूस्ती/साफ करणे अर्ज पाणी विभागातील सर्व दाखले साठीचा अर्ज फी | रु.१००/- प्रती अर्ज |
| १६. | वृक्षतोड परवानगी - अनाधिकृत वृक्ष तोडल्यास | रु. १००००/- प्रतिवृक्ष |
| १७. | व्हॅक्युम लोडर (३००० लिटर क्षमता) सेप्टीक टँक सफाई<br>अ) घरगुती<br>ब) व्यावसायिक<br>क) हद्दीबाहेरील घरगुती<br>ड) हद्दीबाहेरील व्यवसायिक | एका ट्रिपसाठी रु. २०००/-<br>एका ट्रिपसाठी रु. ३५००/-<br>एका ट्रिपसाठी रु. ४०००/-<br>एका ट्रिपसाठी रु. ५०००/- |
| १८. | मैला शुध्दीकरण केंद्रात मैला टाकणे शुल्क PMC<br>अ) खासगी ३००० लिटर पेक्षा कमी क्षमतेने व्हॅक्युम लोडरने<br>ब) खासगी ३००० ते ५००० लिटर पेक्षा कमी क्षमतेने व्हॅक्युम लोडरने<br>क) खासगी ५००० लिटर पेक्षा जास्त क्षमतेचा व्हॅक्युम लोडरने | प्रत्येक ट्रिपसाठी रु.५००/-<br>प्रत्येक ट्रिपसाठी रु.४००/-<br>प्रत्येक ट्रिपसाठी रु. १२००/- |
| १९. | नाहरकत दाखला<br>अ) लॉजिंग बोर्डीग करीता<br>ब) हॉटेल - रेस्टॉरंट नाहरकत दाखला<br>क) बिअर/वाईन शॉप करीता<br>ड) रेस्टॉरंट व बार करीता<br>इ) औदयोगिक आस्थापणा करीता | रु. २५००/-<br>रु.१५००/-<br>रु. ५०००/-<br>रु. ५०००/-<br>रु. २०००/- |
| २०. | शहर हद्दीत स्वतःचे जागेत मोबाईल टॉवर उभारणी करणे प्रशासकीय शुल्क | रु, २०,०००/- |
| २१. | नगरपरिषद रूग्नवाहिका भाडे शहर हद्दीमध्ये वापरल्यास | रु.५००/-<br>रु.१५/-पर किलोमिटरप्रमाणे |
| २२. | प्लंबर परवाना नोंदणी फी व नुतनीकरण | परवाना फी-रु.१०००/-<br>नुतनीकरण फी रु. १०००/- वार्षिक |
| २३. | नगरपरिषद लाईनवरून अनधिकृत नळकनेक्शन जोडणी आढळल्यास दंड | प्रचलीत पाणीपट्टी दराच्या सहापट दंड |
| २४. | रस्ता दुरूस्ती शुल्क (concrete)<br>१) घरगुती<br>२) बंगलाबाग<br>३) व्यावसायिक<br>४) शासकीय | रु.५५००/- प्रति स्क्वे.मी. |
| | रस्ता दुरूस्ती शुल्क (Bituminous)<br>२) घरगुती २) बंगलाबाग<br>३) व्यावसायिक ४) शासकीय | रु.३५००/- प्रति स्क्वे.मी. |


## प्युअरपॉवर वितरकाने कोठागुडेम येथे इलेक्ट्रिशियन आणि डीलर्ससाठी कार्यक्रम आयोजित केला

पुणे (दै. संध्या) :




प्रादेशिक ऊर्जा नेटवर्क मजबूत करण्यासाठी प्युअरपॉवर च्या वितरक नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांनी हॉटेल थाटीपल्ली, कोठागुडेम येथे एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. हा दोन सत्रांचा कार्यक्रम खम्मम आणि भद्राद्री कोठागुडेम येथील स्थानिक तांत्रिक आणि व्यावसायिक समुदायाला जोडण्यासाठी आयोजित करण्यात आला. अलीकडेच नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांना प्रादेशिक वितरक भागीदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक इलेक्ट्रिशियनसाठी तांत्रिक सेमिनारने झाली. हे इलेक्ट्रिशियन या भागातील ऊर्जा इंस्टॉलेशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. या सत्रात प्युअरपॉवर ची प्रगत तंत्रज्ञान आणि एआयएस 156 टप्पा 2 सुरक्षा नियम महत्त्व समजावून सांगितले गेले. सहभागीना स्मार्ट-ग्रिड तंत्रज्ञान आणि सोलर-फर्स्ट प्रणालीबद्दल माहिती देण्यात आली, जेणेकरून ते स्थानिक घरांमध्ये चांगली सेवा देऊ शकतील.

यानंतर संध्याकाळी विशेष डीलर मीट आयोजित करण्यात आली. यात प्रमुख व्यावसायिक भागीदार आणि सहभागी उपस्थित होते. तेलंगणामध्ये वाढणाऱ्या नवीकरणीय ऊर्जा बाजाराबद्दल चर्चा करण्यात आली. प्युअरपॉवर चे "मेड इन इंडिया" हार्डवेअर ग्राहकांना ऊर्जा स्वावलंबन आणि कमी वीज खर्च मिळवून देऊ शकते, यावर भर देण्यात आला.

नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस चे श्री विक्रम म्हणाले, "हा कार्यक्रम ऊर्जा क्षेत्राच्या भविष्यासाठी तज्ञांचे नेटवर्क तयार करण्यासाठी आयोजित केला होता. इलेक्ट्रिशियन आणि डीलर्स एकत्र आल्याने खम्मम आणि कोठागुडेममधील लोकांना फक्त उत्पादन नाही तर एक चांगला ऊर्जा उपाय मिळेल." कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी आपल्या भागात ऊर्जा बदल घडवून आणण्याचा निर्धार केला. नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस च्या मदतीने प्युअरपॉवर आपल्या भागीदारांना सतत तांत्रिक प्रशिक्षण आणि मजबूत सेवा देत राहील.


**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला पुणे- ४११००१ यांचे कार्यालय
ई मेल पत्ता - northpune.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२३३०५

**ई-निविदा सूचना क्रमांक ४९ सन २०२५-२०२६ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२३३०५) हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

ई-निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर htpp://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| काम क्रं. | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | खेड जरेवाडी पारगाव तर्फे खेड अवसरी खुर्द पिंपळगाव खडकी थापलिंग शिंगवे वळती भागडी पिंपरखेड ते रा.मा-५५ प्रजिमा २४६ रस्त्यावर तागडेवस्ती जवळ कि.मी. ४२/४०० मध्ये लहान पुलाची दुरुस्ती करणे ता. आंबेगाव जि.पुणे. | रु. ८०, ३०, ४५१/- |

ई निविदेचे वेळापत्रक


| अ. क्र. | टप्पा | पासून दिनांक व वेळ | पर्यंत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा ऑनलाईन विक्री व स्विकृती कालावधी | दि. १८.०३.२०२६ सकाळी १०.०० पासून | दि. २५.०३.२०२६ संध्याकाळी १८.१५ वाजेपर्यंत |
| २ | तांत्रिक व आर्थिक ई निविदा ऑनलाईन उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | कार्यकारी अभियंता, सा.बां. (उत्तर) विभाग, पुणे यांचे कार्यालयात दिनांक २७.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता (शक्य झाल्यास) | |

संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सूचना)
२) htpp://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, पुणे कार्यालयातील सूचना फलक

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग,
पुणे - ४११ ००१

विमाका/पुणे/जाहि./३७०/२०२५-२६

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पिंपळे गॅस एजन्सीवर नागरिकांचा संताप; कनेक्शन ट्रान्सफरसाठी 3 हजारांची मागणी

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : कासारवाडी येथील पिंपळे गॅस एजन्सीच्या भोंगळ कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. एजन्सीकडून ग्राहकांची सर्रास लूट सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. गॅस टंचाईच्या काळात ग्राहकांना दिलासा देण्याऐवजी कर्मचाऱ्यांच्या उद्धट वर्तणुकीमुळे आणि नियमबाह्य वसुलीमुळे नागरिकांमध्ये तीव संतापाचे वातावरण आहे. गॅस सिलिंडर कनेक्शन ट्रान्सफर करण्यासाठी शासनाने निश्चित केलेली प्रक्रिया धाब्यावर बसवून, एका ग्राहकाकडून तब्बल 3 हजार रुपयांची बेकायदेशीर मागणी करण्यात आली आहे. अशा प्रकारची लूट उघडपणे होत असल्याने एजन्सीवर कोणाचे नियंत्रण आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. घरगुती गॅससारख्या स्फोटक आणि संवेदनशील वस्तूची डिलिव्हरी करताना कर्मचारी अत्यंत बेजबाबदारपणे वागत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. यामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एजन्सीमधील अधिकृत कर्मचाऱ्यांऐवजी केवळ महेल्परफ म्हणून काम करणारे व्यक्तीच ग्राहकांच्या तक्रारींवर निर्णय घेत आहेत. तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांशी हे लोक अत्यंत उद्धट भाषेत बोलत असून, ग्राहकांच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. गॅस बुकिंगसाठी नोटीस बोर्डावर दिलेले अधिकृत क्रमांक गेल्या काही दिवसांपासून बंद आहेत. विशेष म्हणजे हे क्रमांक बंद आहेत याची साधी कल्पनाही एजन्सीमधील कर्मचाऱ्यांना नाही. ग्राहक वारंवार फोन करत असूनही ऑफिसमधील कोणीही फोन उचलण्यास तयार नाही.



### गॅस टंचाईचा शहरावर परिणाम; लग्नसराई, हॉटेल व्यवसाय ठप्प

पिंपरी (दैनिक संध्या) : आखाती युद्धामुळे देशभरात गॅस टंचाईचे संकट आले आहे. जीवनावश्यक वस्तू असलेल्या गॅसचा तुटवडा असल्याने सर्वच स्तरावर त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत. गॅसच्या तुटवड्यामुळे शहरातील अनेकांनी घरातील लग्नकार्य पुढे ढकलली आहेत. तसेच, हॉटेल आणि केटरर्सचालकांनीदेखील बुक केलेल्या ऑर्डर्स रद्द केल्या आहेत. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी गॅस सिलिंडरची गरज असते; मग ते कुटुंब असो, हॉटेल किंवा चहा-वडापावची टपरी, नाष्टा सेंटर असो. प्रत्येक छोट्या आणि मोठ्या व्यावसायिकांच्या सर्वच गोष्टी गॅस सिलिंडरवर अवलंबून असतात. व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा बंद केल्यामुळे हॉटेल आणि केटरर्स व्यावसायिकांवर परिणाम झाला आहे. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने लग्नकार्यामध्ये जवळपास 500 ते 2000 जणांच्या जेवणाच्या ऑर्डर्स मिळतात. हॉटेल आणि केटरर्स व्यावसायिकांबरोबर यातून महिलांना रोजगार मिळत असतो. महिलांना चपाती, पुरी लाटण्याचे, भांडी घासण्याचे काम तर तरुण मुलांना जेवणावळीत वाढपी म्हणून रोजगार मिळत असतो. गॅस सिलिंडर टंचाईमुळे जेवणाच्या ऑर्डर्सचे ॲडव्हान्स रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच, जेवणासाठी लागणारी साधने पुरविणारे भांडीवाले, भाजीवाले, मांडववाले यांचेही नुकसान होत आहे. व्यावसायिक गॅसपुरवठा बंद झाल्याने शहरातील मिठाई दुकानदारांनी किचन बंद ठेवली आहेत. फक्त तयार पदार्थच विकले जात आहे. मिठाईच्या दुकानामध्ये समोसा, कचोरी, ढोकळा, जिलेबी आदी नाष्ट्याचे पदार्थ मिळतात. तर, फरसाणसाठी शेव, मठरी, शंकरपाळे, बाकरवडी, गुलाबजाम, बुंदी, पापडी अशा तळणीच्या पदार्थांना दररोज गॅस सिलिंडर लागतो. सध्या हे पदार्थ करण्याचे काम थांबले आहे. तसेच, फरसाण, शेव, खारीबुंदी आदी पदार्थ मिळत नसल्यामुळे भेळ व पाणीपुरी विक्रेत्यांनादेखील टंचाईचा सामाना करावा लागत आहे.

# पुणे-लोणावळा लोकल सेवेचा ४८वा वर्धापनदिन साजरा

**पिंपरी (दै. संध्या) :**

भारतीय रेल्वेच्या पुणे विभागातील उपनगरीय रेल्वे सेवेला ४८ वर्षे पूर्ण झाली असून ११ मार्च २०२६ रोजी ईएमयू (EMU) लोकल सेवेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला सिनिअर डीईई दिपक भाटी, डेपो इंचार्ज बी. दामोदर, रजत सोनावले, पानीग्रही, विशाल माने, सागर भिल आणि बाळासाहेब टोणे उपस्थित होते. पुणे विभागातील ईएमयू सेवेची सुरुवात ११ मार्च १९७८ रोजी पुणे ते लोणावळा दरम्यान पहिली 'इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट' लोकल धावू लागल्यानंतर झाली. या उपक्रमामुळे विजेवर



चालणाऱ्या उपनगरीय रेल्वेचा प्रारंभ झाला आणि प्रवाशांना अधिक जलद व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली.

प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन २००९ मध्ये १२ डब्यांच्या ईएमयू गाड्या सुरू करण्यात आल्या. पहिली १२ डब्यांची सेवा २३ मार्च २००९ रोजी सुरू झाली, तर दुसरी सेवा १६ एप्रिल २००९ रोजी सुरू करण्यात आली. त्याच वर्षी AC-DC १२ डब्यांच्या ईएमयू गाड्याही टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आल्या. त्यानंतर १० डिसेंबर २००९ रोजी एसी ट्रॅक्शन लाईन कार्यान्वित करण्यात आली.

२०११ मध्ये आधुनिक AC १२ डब्यांची ईएमयू (ICF) सेवा सुरू करण्यात आली. पुढे २०१७ मध्ये आधुनिक सीमेन्स (Siemens) ईएमयू रेक दाखल झाल्यानंतर प्रवाशांच्या प्रवासात अधिक आराम आणि विश्वासार्हता वाढली. १८ नोव्हेंबर २०१९ रोजी ईएमयू रेकसाठी 'IA मेंटेनन्स शेड्यूल' लागू करण्यात आले, ज्यामुळे उपनगरीय सेवांच्या सुरक्षिततेत वाढ झाली. तसेच ६ फेब्रुवारी २०२३ रोजी शिवाजीनगर येथे ईएमयू टर्मिनस सुरू करण्यात आले. गेल्या ४८ वर्षांत पुणे-लोणावळा दरम्यानची ईएमयू सेवा हजारो विद्यार्थी, कर्मचारी आणि प्रवाशांसाठी जीवनवाहिनी ठरली आहे. १९७८ मधील पहिल्या विद्युत लोकलपासून ते आजच्या आधुनिक रेक्सपर्यंत पुणे रेल्वे विभागाने उपनगरीय रेल्वे वाहतूक अधिक मजबूत केली आहे.

दरम्यान, रेल्वे प्रवासी मयुरेश जव्हेरी यांनी सांगितले की, पुणे-लोणावळा मार्गावर स्वयंचलित सिग्नल यंत्रणा सुरू होऊन अनेक वर्षे झाली असली तरी लोकल गाड्यांची संख्या वाढलेली नाही. कर्जत-कल्याण मार्गावर जसे १० ते १५ मिनिटांच्या अंतराने लोकल धावतात, त्याच धर्तीवर पुणे-लोणावळा लोकलची संख्या वाढवावी, अशी मागणी त्यांनी केली.

तर रेल्वे प्रवासी संघाचे माजी अध्यक्ष ईक्बाल (भाईजान) मुलाणी यांनी सांगितले की, पुणे-लोणावळा चौपदरीकरण प्रकल्पासाठी राज्य सरकारने एमआरव्हीसीला आर्थिक वाटा देण्याचा सकारात्मक निर्णय घेतला आहे. त्यामुळे केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयानेही हा प्रकल्प लवकर सुरू करून भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि प्रवासी ताण लक्षात घेता हा प्रकल्प तातडीने पूर्ण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

## 'पोलिस आयुक्तांची भेट' उपक्रमात नागरिकांनी मांडल्या समस्या

**पिंपरी (दै. संध्या) :**

'पोलिस आयुक्तांची भेट' या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांनी थेट पोलिस आयुक्तांसमोर आपल्या विविध समस्या आणि तक्रारी मांडल्या. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात आयोजित उपक्रमात नागरिकांनी वाहतूककोंडी, स्थानिक अडचणी तसेच कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित प्रश्न उपस्थित करत आपल्या व्यथा मांडल्या. पोलिस आयुक्तालयातील शिवनेरी हॉल येथे आयोजित या कार्यक्रमात एकूण 76 नागरिकांनी उपस्थिती दर्शवली. या वेळी नागरिकांनी शहरातील वाहतूककोंडी, पार्किंगची समस्या, स्थानिक पातळीवरील वाद तसेच इतर नागरी अडचणींबाबत सूचना आणि तक्रारी मांडल्या. उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या तक्रारींची नोंद घेऊन संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या. कार्यक्रमाला पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलिस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलिस आयुक्त सारंग आवाड, बसवराज तेली आणि सर्व उपायुक्त उपस्थित होते. यासह व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व सहायक पोलिस आयुक्त आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक सहभागी झाले होते. त्यामुळे विविध पोलिस ठाण्यांशी संबंधित प्रश्नांवर तत्काळ चर्चा होऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## दूषित पाणी पुरवठा, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

*महिलांच्यावतीने हंडा मोर्चा काढण्याचा मच्छिंद्र तापकीर यांचा इशारा*

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ मधील काळेवाडी-विजयनगर परिसरात मागील काही दिवसांपासून दूषित व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. या संदर्भात माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर यांनी महापालिका आयुक्तांकडे लेखी निवेदन देत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. सात दिवसांत पाणीपुरवठा स्वच्छ व सुरळीत झाला नाही तर या परिसरातील महिलांच्या वतीने महापालिकेवर






हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काळेवाडी-विजयनगर, पवनानगर, आदर्शनगर, काळेवाडी स्मशानभूमी परिसर, आशीर्वाद कॉलनी, सहकार कॉलनी, आजाद कॉलनी, काळेवाडी गावठाण तसेच ज्योतिबानगर या भागांमध्ये मागील आठवडाभरापासून दूषित व गढूळ पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना ताप, उलटी, जुलाब यांसारख्या आजारांचा त्रास होऊ लागला असून अनेक नागरिक आजारी पडत असल्याची माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांना तात्काळ स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा करण्यात यावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना तातडीचे निर्देश द्यावेत, अशी मागणी मच्छिंद्र तापकीर यांनी आयुक्तांकडे केली आहे. तसेच पुढील सात दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत व स्वच्छ झाला नाही तर काळेवाडी-विजयनगर परिसरातील महिलांच्या वतीने महापालिकेवर हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकला गती द्या

*अर्थसंकल्पातील तरतूदीनंतर खासदार श्रीरंग बारणे यांची रेल्वे मंत्र्यांकडे मागणी*

**पिंपरी (दै. संध्या) :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 5100 कोटी रुपयांची तरतूद केल्यानंतर मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. राज्य शासनाने निधीची तरतूद केल्याने आता रेल्वे मंत्रालयाने ट्रॅक निर्माणाच्या कामाला गती देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.



दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची खासदार बारणे यांनी भेट घेतली. पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅकचा गरज त्यांना समजावून सांगितली. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वे सेवा सुरु आहे. याचा दररोज एक ते सव्वा लाख प्रवासी लाभ घेतात. या मार्गावर दोन ट्रॅकवरच रेल्वे धावतात. त्यामुळे या मार्गावर रेल्वे गाड्यांची संख्या वाढविणे शक्य नाही. सन २०१७ मध्ये पुणे ते लोणावळा लोहमार्गावर तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्याला मान्यता देण्यात आली.

रेल्वे विभागाने सर्वेक्षणही पूर्ण केले आहे. ट्रॅकसाठी आवश्यक जागाही रेल्वे विभागाकडे आहे. राज्य सरकारकडून निधी मिळत नसल्याने ट्रॅकच्या कामाला अद्यापपर्यंत सुरुवात झाली नाही. रेल्वे मंत्री वैष्णव यांनीही या प्रस्तावित ट्रॅकची पाहणी केली होती. निधी देण्याच्या सूचना राज्याच्या सचिवांना दिल्या होत्या. या ट्रॅकसाठी राज्य सरकार ५० टक्के आणि केंद्र सरकारची ५० टक्के हिस्सेदारी निश्चित आहे.

महायुती सरकारच्या दुसऱ्या अर्थसंकल्पात पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 5100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे आता रेल्वे मंत्रालयाने ट्रॅक निर्माणाच्या कामाला गती द्यावी अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. त्याला रेल्वेमंत्री वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राज्य सरकारने निधीची तरतूद केल्याने आता केंद्र सरकार तातडीने पाऊले उचलेल अशी ग्वाही वैष्णव यांनी दिल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

## 'साहेब कामात आहेत!'; पोलिस ठाण्यांत तक्रारदारांना भेटीचा प्रश्न

**पिंपरी (दै. संध्या) :**

शहरातील काही पोलिस ठाण्यांमध्ये तक्रार घेऊन येणाऱ्या नागरिकांना संबंधित वरिष्ठ पोलिस निरीक्षकांची (ठाणे इंचार्ज) प्रत्यक्ष भेट मिळणे कठीण होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. तक्रारींचे समाधान न झाल्याने काही नागरिकांनी थेट पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या कार्यालयात धाव घेतल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयाकडून सर्व पोलिस ठाण्यांना सूचना देण्यात आल्या असून, तक्रारदारांना वरिष्ठ अधिकाऱ्यांची सहज भेट मिळावी, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहरातील पोलिस ठाण्यांमध्ये दररोज विविध प्रकारच्या तक्रारींसाठी मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. चोरी, फसवणूक, आर्थिक व्यवहारांतील वाद, कौटुंबिक तक्रारी तसेच स्थानिक पातळीवरील विविध वादांबाबत नागरिक पोलिसांकडे दाद मागण्यासाठी येतात. प्राथमिक स्तरावर तक्रारींची माहिती कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेतली जाते. मात्र, काही प्रकरणांमध्ये पुढील कार्यवाहीबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याची भावना तक्रारदारांमध्ये असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे काही तक्रारदारांनी थेट वरिष्ठ कार्यालयाकडे धाव घेतल्याचे दिसून येते.

## भूसंपादनासाठी निधी कमी पडू देणार नाही

**पिंपरी (दै. संध्या) :**

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
- आमदार महेश लांडगे यांच्या लक्षवेधीवर राज्य शासनाचा प्रतिसाद
- पुणे-पिंपरी-चिंचवडमधील रस्ते, विकास प्रकल्पाना गती देण्याची मागणी





"पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये सुरू असलेल्या रस्तेविकास आणि इतर प्रकल्पांचे भूसंपादन करण्यासाठी गती देण्यात येईल. आवश्यक निधी महापालिका आणि राज्य शासन दोन्हीकडून उपलब्ध करून दिला जाईल. कालबद्ध नियोजनासाठी लवकरच आढावा बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) मधील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी आज विधानसभेत जोरदार चर्चा झाली. आमदार महेश लांडगे यांनी पुणे-नाशिक महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडी आणि एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पातील भूसंपादन प्रक्रियेबाबत राज्य शासनाचे लक्ष वेधले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सकारात्मक प्रतिसाद दिला.आमदार लांडगे म्हणाले की, पुणे-नाशिक महामार्ग (NH-60) नाशिक फाटा ते इंद्रायणी नदीपर्यंत ६१ मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादन पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्याची आवश्यकता आहे. नाशिक फाटा ते खेड दरम्यान प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर व जोड रस्ते प्रकल्प लवकरच सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच,संपूर्ण PMR क्षेत्रात वाहतूक व्यवस्थापनासाठी सिंगल पॉईंट अथॉरिटी आवश्यक आहे. एमआयडीसी रस्त्यांचे आधुनिकीकरण करुन औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक सुलभ करण्यासाठी विशेष पुढाकर घेण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण पुणे महानगर प्रदेशात मेट्रो नेटवर्क वाढवावा, अशी मागणी सभागृहात केली. तसेच, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या महामार्गासाठी एलिव्हेटेड कॉरिडॉरची घोषणा केली आहे, मात्र १०० टक्के भूसंपादन न झाल्यामुळे रुंदीकरणाचे काम सुरू करता येत नाही. त्यासाठी कालबद्ध नियोजन करून भूसंपादन लवकर पूर्ण करण्याची गरज आहे. देवाभाऊंच्या नेतृत्त्वाखाली पुणे मेट्रोपोलिटन रिजनमध्ये शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले गेले आहेत आणि आगामी काळात सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या या परिसरात विकासाचे रोल मॉडेल तयार होईल, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

> महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी भूसंपादन निधी लवकरात लवकर उपलब्ध करण्यात येईल. काही निधी महापालिका उपलब्ध करेल. त्यांच्या माध्यमातून भूसंपादन होईल. तसेच, पीएमआरडीए आणि राज्य सरकार अशा पातळीवरही निधी उपलब्ध करून देण्यासाठी आढावा बैठक घेण्यात येईल.
>
> – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

## अर्थसंकल्पावर उपसूचनांचा पाऊस

पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सन 2026-27 चा अर्थसंकल्पास स्थायी समितीकडून सोमवारी (दि.16) होणाऱ्या विशेष सभेत उपसूचना दिल्या जाणार आहेत. तब्बल 9 वर्षांनंतर निवडणूक झाल्याने अर्थसंकल्पास पदाधिकाऱ्यांसह नगरसेवकांकडून उपसूचनांचा भडिमार केला जाऊ शकतो. महापालिकेचा सन 2026-27 चा अर्थसंकल्प आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्याकडे 28 फेब्रुवारीला सादर केला. त्यावर चर्चा करून स्थायी समितीकडून येत्या सोमवारी सकाळी अकरा होणाऱ्या विशेष सभेत उपसूचना दिल्या जाणार आहेत. स्थायी समितीकडे अनेक नगरसेवकांनी प्रभागातील नवीन कामांसाठी उपसूचना दिल्या आहेत. आतापर्यंत एकूण 80 उपसूचना प्राप्त झाल्याचे समजते. निवडणूक काळात नगरसेवकांनी प्रभागात विविध कामे करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले होते. त्या कामांचा अर्थसंकल्पात समावेश करून आवश्यक निधीची तरतूद मिळावी, यासाठी पदाधिकार्यांसह नगरसेवकांची धडपड सुरू आहे. मात्र, महापालिकाची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने अनेक नवीन कामांना आयुक्तांनी अर्थसंकल्पात स्थान दिलेले नाही.

## "बॉक्स स्ट्रक्चर"मुळे वाकड ते मामुर्डी पट्ट्यातील

# वाहतूक कोंडी फुटणार

**आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; नवीन आठ ठिकाणी 'बॉक्स स्ट्रक्चर' उभारणार**



**पिंपरी (दै. संध्या) :**

पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाकड ते मामुर्डी या पट्ट्यात होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी मागणी केलेल्या नवीन आठ ठिकाणी 'बॉक्स स्ट्रक्चर' (अंडरपास) उभारण्याबाबत शासन सकारात्मक असून, त्याबाबतची तांत्रिक माहिती घेण्याचे काम सुरू असल्याचे नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी गुरुवारी सांगितले. यामुळे हिंजवडी आयटी पार्कसह, किवळे, रावेत, पुनावळे, ताथवडे, आणि वाकड परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार शंकर जगताप यांनी तारांकित प्रश्नाद्वारे या भागातील गंभीर वाहतूक समस्या मांडली. वाकड ते मामुर्डी दरम्यान गेल्या काही वर्षांत आयटी पार्क, शैक्षणिक संस्था आणि मोठ्या गृहप्रकल्पांमुळे नागरीकरण वाढले आहे. मात्र, महामार्गाची अपुरी क्षमता आणि ग्रेड सेपरेटरच्या अभावामुळे स्थानिक वाहतूक व महामार्गावरील वाहने एकमेकांत मिसळल्याने तासनतास कोंडी होत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. सयाजी अंडरपास, भुमकर चौक, ताथवडे, पुनावळे, पवना नदी क्रॉसिंग, किवळे जंक्शन आणि मामुर्डी अशा एकूण आठ महत्त्वाच्या ठिकाणी नवीन अंडरपास व 'बॉक्स स्ट्रक्चर' प्रस्तावित आहेत. या कामांमुळे महामार्ग क्रॉसिंग करणे सुकर होईल आणि सेवा रस्त्यांवरील भार कमी होईल. गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या संथ गतीच्या कामांमुळे वाकड आणि रावेत परिसरात वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले आहे. ही कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी आग्रही मागणी जगताप यांनी केली. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, आमदार जगताप यांनी सुचवलेल्या आठ अंडरपासबाबत शासनाकडून तांत्रिक तपासणी सुरू असून लवकरच सकारात्मक पावले उचलली जातील.

> "हिंजवडी आयटीपार्कसह, किवळे, रावेत, पुनावळे, ताथवडे, आणि वाकड हा परिसर शहराच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. त्यामुळे महामार्गावरील रस्त्यांच्या संदर्भातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणे आणि नवीन आठ ठिकाणी अंडरपास उभारणे हाच यावरील कायमस्वरूपी उपाय आहे. विधानसभेत हा प्रश्न मांडल्यानंतर शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, ही कामे लवकरात लवकर मार्गी लावून मी हा परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी कटिबद्ध आहे."
>
> – आमदार शंकर जगताप

## थोडक्यात पण महत्वाचे...



### इंदिरा गांधी वसाहत येथे आरोग्य शिबिर; मधुमेह व उच्च रक्तदाबाबाबत मार्गदर्शन

■ फॅमिली अडॉप्शन प्रोग्राम अंतर्गत वैद्यकीय तपासणी व औषधोपचार


बारामती (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेच्या वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट अंतर्गत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पुणे जनऔषध वैद्यक शास्त्र विभागाच्या वतीने फॅमिली अडॉप्शन प्रोग्राम (FAP) अंतर्गत औंध रोड, पुणे येथील इंदिरा गांधी वसाहत येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात जनऔषध वैद्यक शास्त्र विभागातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी स्थानिक नागरिकांची आरोग्य तपासणी केली. विशेषतः मधुमेह व उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांवर नियंत्रण कसे ठेवावे, योग्य आहार व जीवनशैली कशी ठेवावी याबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच तपासणीनंतर आवश्यक त्या नागरिकांना औषधोपचार देण्यात आले. या आरोग्य शिबिरामध्ये MBBS विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून शिबिराच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले.

### उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शिवनगर विद्याप्रसारक मंडळाला 101 लॅपटॉपचे हस्तांतरण

बारामती (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते एचडीएफसीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून देण्यात आलेल्या १०१ लॅपटॉपचे माळेगाव येथील शिवनगर विद्याप्रसारक मंडळाला हस्तांतरण करण्यात आले. यावेळी माळेगाव नगरपंचायतीचे नगराध्यक्ष सुयोग सातपुते, शिवनगर विद्याप्रसारक मंडळाचे संस्थेचे सचिव डॉ. धनंजय ठोंबरे, कृषी विज्ञान केंद्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश नलावडे, एचडीएफसी बँकेच्या राज्यप्रमुख स्वाती शाळीग्राम, पुणे क्षेत्रप्रमुख विदुला देशपांडे, बारामतीच्या क्षेत्र प्रमुख दत्ता राजूरकर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्वप्नातली शिक्षण संस्थेची निर्मिती आणि विकास करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे, याकामी एचडीएफसी बँकेचे मोलाची साथ लाभली आहे, याबद्दल एचडीएफसीच्या बँकेचे श्रीमती पवार यांनी आभार मानून यापुढे संस्थेला अशाप्रकारे मदत करावी, आवाहन केले. डॉ. ठोंबरे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या उपाध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महाविद्यालयाच्या शैक्षणिक कामकाजात सुधारणा करण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले होते. उपमुख्यमंत्री यांचे धोरण विषयक सल्लागार डॉ. संतोष भोसले यांच्या प्रयत्नातून संस्थेला १०१ लॅपटॉप, ३६ इंटर ॲक्टिव्ह स्क्रीन, शाळांसाठी दोन स्टेम लेबोरेटरीज मंजूर झाल्या आहेत. मुलींना शाळेत येण्याजाण्यासाठी ३०० सायकलींना मंजुरी मिळाली आहे. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगा विरुद्ध एचपीव्ही लसीकरण करण्यात येत आहे, असेही डॉ. ठोंबरे म्हणाले. यावेळी विश्वस्त राजेंद्र काटे, धन्यकुमार जगताप, विराज खलाटे, प्रवीण पोंदुकुले, रोहन देवकाते, श्री. डॉ. मोहन नेवसे, गणपतराव देवकाते,आशा जराड, प्रल्हाद वरे, गौरव जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य मुख्याध्यापक, नगरसेवक आदी उपस्थित होते.

### पिंकी माळी यांच्या वारसाला पाच लाख रुपयाचा धनादेश सुपूर्द

बारामती (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते दिवंगत फ्लाईट अटेंडंट पिंकी शिवकुमार माळी यांच्या वारसाला आर्थिक मदत म्हणून ५ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उपमुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी सचिन यादव उपस्थित होते. बारामती येथे २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या अपघातामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत दिवंगत पिंकी शिवकुमार माळी यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला होता, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५ लाख रुपये देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आज दिवंगत माळी यांचे पती सोमविकास सैनी यांच्याकडे आज धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे, अशी माहिती तहसीलदार स्वप्नील रावडे यांनी दिली आहे.



### पुणे–मुंबई वाहतुकीसाठी पर्यायी रस्ता; नेरळ–वांद्रे–शिरूर मार्गाला तत्त्वतः मंजुरी

पुणे (दैनिक संध्या) : पुणे आणि मुंबई या दोन महानगरांना जोडणाऱ्या द्रुतगती महामार्गावर वाढत चाललेल्या वाहतूक ताणाच्या पार्श्वभूमीवर नेरळ–वांद्रे–शिरूर या पर्यायी मार्गाच्या विकासाला राज्य सरकारने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प मंजूर व्हावा यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. उरण – कर्जत – नेरळ – वांद्रे – पाईट – शिरोली – पाबळ – मलठण – शिरूर या मार्गाचे काम प्राधान्याने हाती घ्यावे, अशी मागणी त्यांनी राज्य सरकारकडे केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत या महत्त्वाच्या प्रकल्पाला तत्त्वतः मंजुरी देण्यात आली. फेब्रुवारी महिन्यात मुंबई-पुणे-एक्सप्रेसवे वर आडोशी बोगद्याजवळ टँकर अपघात झाल्यानंतर जवळपास ३२ तास वाहतूक कोंडी झाली होती. गॅस गळतीमुळे महामार्ग बंद ठेवावा लागल्याने प्रवासी अनेक तास अडकून पडले होते. या घटनेनंतर खासदार कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पर्यायी मार्गाची गरज अधोरेखित करत नेरळ ते शिरूर या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नेरळ ते वांद्रे दरम्यानचा सुमारे २० किलोमीटरचा भाग पर्यावरणीय दृष्ट्या अतिसंवेदनशील असल्याने येथे घाटमार्ग विकसित करण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाची परवानगी आवश्यक आहे. यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही खासदार कोल्हे यांनी दिले. या प्रकल्पामुळे भविष्यात पुणे–मुंबई, मुंबई–छत्रपती संभाजीनगर आणि मुंबई–सोलापूर या मार्गांमधील संपर्क अधिक सुलभ होईल तसेच विद्यमान महामार्गांवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असेही त्यांनी सांगितले. सह्याद्री पर्वतरांग कोकण आणि महाराष्ट्र पठार यांच्यामधील नैसर्गिक विभाजनरेषा असून या भागात अनेक घाटमार्ग आहेत. मात्र माळशेज घाट आणि बोरघाट या दोन घाटांमधील अंतर सुमारे ६० किलोमीटर आहे. या दोन घाटांदरम्यान पर्यायी घाटमार्ग विकसित झाल्यास वाहतुकीसाठी एक सक्षम पर्याय उपलब्ध होईल. यामुळे पुणे–शिरूर, पुणे–नाशिक महामार्ग तसेच तळेगाव–चाकण–शिक्रापूर मार्गावरील वाहतुकीची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.

# ग्रामीण महिला उद्योजकतेचा भव्य उत्सव मिनी सरस उत्साहात संपन्न

नाझरे सुपे (दै. संध्या)

जिल्हा परिषद पुणे अंतर्गत उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन "मिनी सरस : सावित्री जत्रा २०२६" हा पाच दिवसीय महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. ग्रामीण स्वयंसहाय्यता समूहांच्या कष्ट, कौशल्य आणि उद्योगशीलतेला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देत महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या जत्रेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या माननीय उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी खासदार मेधा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमात स्वयंसहाय्यता समूहांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध बँकांच्या माध्यमातून सुमारे ४० कोटी रुपयांच्या कर्ज धनादेशांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी तसेच विद्यमान उद्योग वाढवण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळणार आहे.



या प्रदर्शनामध्ये १०० स्टॉल्स आणि १५१ स्वयंसहाय्यता समूहांनी सहभाग नोंदवला. ग्रामीण महिलांनी तयार केलेली हस्तकला उत्पादने, घरगुती उद्योगातील वस्तू, पारंपरिक खाद्यपदार्थ, कृषी व पूरक उद्योगातील उत्पादने तसेच विविध नाविन्यपूर्ण वस्तू मोठ्या उत्साहात सादर करण्यात आल्या. पुणेकरांनी मोठ्या संख्येने जत्रेला भेट देत महिलांच्या उत्पादनांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पाच दिवसांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर विक्री झाली.

७ मार्च (शनिवार) – ₹११,३६,५०३
८ मार्च (रविवार) – ₹९,४३,४९७
९ मार्च (सोमवार) – ₹९,६०,५७८
१० मार्च (मंगळवार) – ₹१०,३०,२०९
११ मार्च (बुधवार) – ₹११,२९,२९१

अशा प्रकारे पाच दिवसांत एकूण ₹५२,२०,५८७ इतकी विक्री झाली. तसेच ऑनलाइन विक्रीचा संपूर्ण अहवाल अद्याप प्राप्त होणे बाकी आहे. याशिवाय जत्रेदरम्यान आयोजित बायर–सेलर मीट (खरेदी-विक्री संमेलन) मध्ये स्वयंसहाय्यता समूहांना ₹१०,२०,५०० रुपयांच्या ऑर्डर्स प्राप्त झाल्या. त्यामुळे ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना नवी बाजारपेठ उपलब्ध झाली असून त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळ मिळाले आहे. समारोप कार्यक्रमास डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.), विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी विभागीय उपायुक्त (विकास) प्रांजल शिंदे उपस्थित होते. विभागीय आयुक्तांनी प्रदर्शनातील विविध स्टॉलना भेट देत महिलांशी संवाद साधला तसेच काही उत्पादने खरेदी करून त्यांना प्रोत्साहन दिले.

> "मिनी सरस : सावित्री जत्रा हा उपक्रम ग्रामीण महिलांच्या कौशल्याला बाजारपेठ उपलब्ध करून देणारा महत्त्वाचा मंच ठरला आहे. या माध्यमातून महिलांच्या स्वावलंबनाला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळत आहे."

समारोप प्रसंगी पाच दिवसांत सर्वाधिक विक्री करणारे, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे तसेच उत्कृष्ट व स्वच्छ स्टॉल सादर करणारे स्वयंसहाय्यता समूह यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व सहभागी स्वयंसहाय्यता समूहांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जत्रेला सांस्कृतिक रंगतही लाभली. ऋतुजा इंगवले (मिस महाराष्ट्र २०२०) यांच्या माध्यमातून आयोजित "खेळ पैठणीचा" या आकर्षक उपक्रमाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आंबेगाव, बारामती, जुन्नर, वेल्हे, शिरूर, खेड आणि इंदापूर तालुक्यातील महिलांनी लेझीम नृत्य, पारंपरिक नृत्य, मंगळागौर, भजन, भावगीत तसेच विविध लोकसांस्कृतिक कार्यक्रम सादर करून जत्रेला उत्सवी रंगत दिली.

याशिवाय कोकोडर्मा या जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून गिफ्ट प्लांट तयार करण्याचे प्रशिक्षण सुमारे ५० महिलांना देण्यात आले. या प्रशिक्षणामुळे महिलांना नाविन्यपूर्ण व्यवसायाची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच आयोजित खरेदी-विक्री संमेलनात विविध उद्योग प्रतिनिधींनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे युगांडा येथील प्रतिनिधींनीही या प्रदर्शनाला भेट देत ग्रामीण महिलांच्या उद्योगांचे कौतुक केले.

> मिनी सरस : सावित्री जत्रा" ही केवळ विक्री व प्रदर्शनाची संधी नसून ग्रामीण महिलांच्या कष्ट, जिद्द आणि उद्योगशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणारी प्रेरणादायी चळवळ ठरली आहे. या उपक्रमामुळे महिला सक्षमीकरण, स्वावलंबन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळण्यास मोठी मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका स्तरावरील उमेद स्टाफ तसेच जिल्हास्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या सुयोग्य नियोजन, समन्वय आणि परिश्रमांमुळे हा संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

## गॅस टंचाईमुळे सर्वसामान्यांचे मोडले कंबरडे

नारायणगाव (दै. संध्या)

अमेरिका, इस्राइल आणि इराणी यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा मोठा फटका भारतीयांना बसत आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक सिलेंडर गॅस 5 मार्चपासून कंपन्यांनी वितरणास व बुकिंगसाठी बंदी घातली आहे. त्यामुळे गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे.

जुन्नर तालुक्यातील हॉटेल आणि रेस्टोरंट व्यवसायासाठी गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने हॉटेल व्यवसाय पूर्णपणे कोलमडला आहे. अनेक हॉटेलचालकांना आपल्या नियमित मेनुमध्ये मोठे बदल करावे लागले आहेत. काही ठिकाणच्या हॉटेलमध्ये तर ग्राहकांच्या आवडीच्या असलेल्या आणि जास्त वेळ गॅसवर शिजवाव्या लागणारे डोसा, उतप्पा, दाल मखनी, दम बिर्याणी आणि काही चायनीज पदार्थ हे मेनूकार्डमधून तात्पुरते गायब झाले असून अमृततुल्य चहावाले आता फक्त एकदाच चहा उकळून थरमास मध्ये ठेवत आहेत व काहींनी बोर्ड



लावले आहेत की ग्राहकांच्या मागणीनुसार स्पेशल चहा, ब्लॅक टी, कॉफी इत्यादी बनवून मिळणार नाही, गॅस टंचाईमुळे एकदाच बनविलेला चहा ग्राहकांना मिळेल. असे लिहिले आहे.तसेच बऱ्याचशा खानावळी गॅस टंचाईमुळे बंद पडू लागल्या असल्यामुळे शिक्षणासाठी बाहेरून आलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचा जेवणाचा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

तसेच लग्न समारंभ, सत्कार समारंभ आणि विविध सामाजिक कार्यक्रमांच्या आयोजनावर गॅस सिलिंडरच्या तुटवड्याचा मोठा परिणाम झाला आहे. या टंचाईचा सर्वाधिक फटका कॅटरिंग व्यवसायाला बसला असून अनेक व्यावसायिकांनी येणाऱ्या मोठ्या ऑर्डर स्वीकारणे बंद केले आहे. काही कुटुंबांना लग्नाचे मुहूर्त पुढे ढकलण्याची किंवा असलेला कार्यक्रम साधेपणा पद्धतीने उरकण्याची वेळ आली आहे.

काही ठिकाणी तर घरगुती गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी गॅस एजन्सीसमोर उन्हाचा तडाखा वाढत असतानाही महिला, जेष्ठ नागरिक आणि कामगार वर्गातील अनेक जण मोठ्या रांगा लावत आहेत. तसेच रंग उत्पादक कंपन्यांना आवश्यक कच्चा माल वेळेत मिळत नसल्याने उत्पादन खर्च वाढला असून रंगांच्या दरात वाढ झाली आहे.गॅसवर पर्याय म्हणून बऱ्याच जणांनी स्वयंपाक बनवण्यासाठी लाईटवर चालणाऱ्या शेगड्या खरेदी करण्यास सुरुवात केली आहे.तर हॉटेल व्यावसायिक आता कोळशाच्या भट्ट्याकडे वळू लागले आहेत.

> लग्नसमारंभांच्या हंगामात अचानक निर्माण झालेल्या गॅस तुटवड्यामुळे व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. एका मोठ्या लग्नसमारंभासाठी 10 ते 15 सिलिंडरची गरज असते. मात्र सध्याचा गॅसचा पुरवठा कमी होत असल्याने आम्हाला तर विवाह सोहळ्याचा स्वयंपाक करायचा कशावर असा प्रश्न उपस्थित होत आहे.
> **- अनिकेत गाढवे, केटरर्स**

> एक सिलिंडर केवळ एक दिवस पुरतो. त्यामुळे आता व्यावसायिक एकमेकांकडे सिलिंडर उपलब्ध आहे का, याची विचारणा करत आहेत. गॅस वाचवण्यासाठी अनेक हॉटेलांनी गरमागरम भाकरी देणे बंद केले असून केवळ फुलका किंवा चपातीचा पर्याय ग्राहकांसमोर ठेवला आहे. जर अशीच परिस्थिती कायम राहिली तर हॉटेल व्यवसायिकांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय कामगारांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता असून व्यवसायांना टाळे लावण्याची वेळ येईल,अशी भीती हॉटेल व्यावसायिक यांनी व्यक्त केली आहे.
> **- अनिलतात्या दिवटे, (राजधानी चहा), प्रमिला वाळुंज (सुरुची भोजनालय) हॉटेल व्यावसायिक**

## माऊलींच्या संजीवन समाधीवरील चंदन उटी पूजेची नोंदणी सुरू

आळंदी (दै. संध्या)

■ गुढीपाडव्यापासून भाविकांना पूजेसाठी संधी

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीवरील पारंपरिक चंदन उटी पूजेची नोंदणी सुरू झाली असून गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारपासून (ता.२०) भाविकांना चंदन उटी पूजेसाठीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रीष्म ऋतूमध्ये माऊलींच्या संजीवन समाधीला शीतलता मिळावी, या उद्देशाने चंदनाची उटी लावण्याची परंपरा आहे. चंदन उटी पूजा म्हणजे भाविकांसाठी कुटुंबियांसह संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीसमोर बसून पूजा करण्याची एक आध्यात्मिक पर्वणी मानली जाते. त्यामुळे या पूजेला विशेष महत्त्व आहे. माऊलींच्या संजीवन समाधीवर प्रतिवर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) ते ७ जूनपर्यंत चंदन उटी लावण्यात येते. गुढीपाडव्याच्या दिवशी आळंदी देवस्थानतर्फे समाधीवर चंदन उटीद्वारे आकर्षक सजावट केली जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून (ता.२०) सर्वसामान्य भाविकांसाठी चंदन उटी पूजेसाठी नोंदणी सुरू करण्यात आली आहे. या पूजेसाठी ११ हजार रुपये देणगी शुल्क निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये पूजेचे साहित्य, दक्षिणा तसेच एका कुटुंबातील पाच जणांना दुपारी दीड ते तीन या वेळेत माऊलींच्या संजीवन समाधीसमोर बसून पूजेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे. दरम्यान, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीवर गुढीपाडव्याच्या दिवशी श्री गणेश अवतार, रामनवमीच्या दिवशी महादजी शिंदे सरकारांची 'शिंदेशाही उटी' प्रतिकृती, नृसिंह जयंतीनिमित्त नृसिंह अवतार तसेच अक्षय तृतीया दिवशी पांडुरंगाचा अवतार चंदन उटीच्या माध्यमातून साकारला जातो. या आकर्षक उटी सजावटीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने गर्दी करत असतात.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

चाकण (दै. संध्या)

अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पुणे जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, समितीच्या जिल्हा अध्यक्षपदी डॉ. अरूण बुरांडे यांची निवड करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्षपदी वसंत कदम, कार्याध्यक्षपदी अनिल वेल्हाळ आणि सचिवपदी भारत विठ्ठलदास यांची निवड करण्यात आली. तसेच बुवाबाजी संघर्ष विभागाची जबाबदारी शाम राक्षे यांच्याकडे देण्यात आली असून विविध उपक्रम विभागासाठी डॉ. ज्ञानदेव सरवदे, वैज्ञानिक जाणीवा विभागासाठी नारायण कर्पे, प्रकाशन विभागासाठी नवनाथ लोंढे आणि प्रशिक्षण विभागासाठी वामन बाजारे यांची निवड करण्यात आली आहे. महिला विभाग प्रमुख म्हणून शुभांगी घनवट, युवा विभाग प्रमुख म्हणून राहुल केदारी, जातीअंत विभाग प्रमुख म्हणून प्रकाश भारद्वाज, मानस मित्र विभाग प्रमुख म्हणून अनुराधा काळे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून धनंजय कोठावळे यांची निवड झाली आहे. कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. सौरभ बागडे यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच अंनिसच्या पिंपरी - चिंचवड शाखाध्यक्षपदी संतोष रणदिवे, कार्याध्यक्षपदी सुरेश बावणकर आणि सहकार्याध्यक्षपदी अंजली इंगळे यांची निवड करण्यात आली.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धुमाळवाडीचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

धुमाळवाडी (दै. संध्या)

"प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाचे प्रभावी साधन आहे.जिल्हा परिषद शाळा ही माते नंतरची माता आहे. इंग्रजी शिक्षण कौशल्य आहे तर मराठी शिक्षण संस्कार,संस्कृती याचे द्योतक आहे. वाचन चळवळ वाढीस लागावी म्हणून मुलांच्या वाढदिवसादिनी पुस्तके भेट द्या.वार्षिक स्नेह संमेलनांतून मुलांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळतो." असे प्रतिपादन ग्रामीण कथाकार प्रा.रवींद्र कोकरे यांनी केले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धुमाळवाडी (ता.बारामती) आयोजित वार्षिक पारितोषिक व स्नेहसंमेलन कार्यक्रमात प्रमुख



अतिथी म्हणून प्रा.रवींद्र कोकरे यांनी मार्गदर्शन केले. सुनेत्राजित साहित्य,कला, क्रीडा,सांस्कृतिक प्रतिष्ठान अहिल्या नगर(पणदरे) यांचे वतीने विद्यार्थ्यांना महापुरुषांची चरित्रे, बालवाङ्मय,संस्काराची महती यावरील दर्जेदार साहित्य कृती पुस्तके भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ मार्गदर्शक दशरथ धुमाळ,प्रमुख उपस्थिती जि.प.सदस्य मंगेश जगताप,सरपंच बाळासाहेब कोकरे, उपसरपंच निलेश कोकरे, रणजित तावरे,रामभाऊ कोकरे,बाळासो वाघमोडे उपस्थित होते. स्नेहसंमेलनांत मुलांनी गणेश स्तवन,भक्ती गीत, लोकगीते,पोवाडा,भारूड, लावणी, कोळीगीत, देशभक्ती, नाटिका, बालगीते यातून रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक दत्तात्रय जगताप, सूत्रसंचालन कलाशिक्षक सतिश हाके यांनी केले.पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ,पालक,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पीरसाहेब यात्रेनिमित्त गाथा पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

मोरगाव (दै. संध्या)

पीरसाहेब यात्रेनिमित्त पिराचामळा (मोरगाव) येथे गाथा पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे 12 मार्च ते 16 मार्च 2026 रोजी आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सप्ताहाचे आयोजन केले जात असून यंदाचे 36 वे वर्ष आहे.पीरसाहेब देवाचा संदल कार्यक्रम मिती फाल्गुन नवमी गुरुवार दि.12/03/2026 रोजी रात्री 12 वाजता होईल.श्री दत्त कार्यकारी मंडळ,जेजुरी व ह.भ.प.पिराजी नेवसे महाराज (आळंदी) संत तुकाराम गाथा भजन सोहळा होईल.पहाटे 4 ते 6 काकडा आरती,सकाळी 7



ते 12 गाथा भजन,दुपारी 12 ते 4 महाप्रसाद व विश्रांती,सायंकाळी 4 ते 5 हरिपाठ,सायं.5 ते 6 व्याख्यान,रात्री 7 ते 9 कीर्तन,रात्री 9 ते 10 यावेळेत चारही दिवस भोजन व्यवस्था पिराचे मंदीर याठिकाणी होईल त्यानंतर रात्री 11 ते 4 हरिजागर अशाप्रकारे दैनंदिन कार्यक्रम होतील. 12 मार्च ला थोरात सर बेलसर यांचे व्याख्यान, ह.भ.प.राणीताई महाराज कोलते (वढाणे) यांची किर्तनसेवा,जागर-पीरसाहेब देवाचा संदल होईल.13 मार्च रोजी नाना नेवसे मोरगाव यांचे व्याख्यान, ह.भ.प.बबन महाराज खेडकर (आळंदी देवाची) यांची कीर्तनसेवा,हनुमान भजनी मंडळ ढोलेमळा, हनुमान भजनी मंडळ भोईटेवाडी यांचा जागर होईल.14 मार्च रोजी पवन पिदूरकर श्री क्षेत्र आळंदी यांचे व्याख्यान, ह.भ.प.प्रविण महाराज चौधरी (खोर) यांची किर्तनसेवा,विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ मोरगाव,पीरसाहेब भजनी मंडळ,खंडुखैरेवाडी भजनी मंडळ,मासाळवाडी भजनी मंडळ याचा जागर होईल. 15 मार्च रोजी सुशिलाताई जाधव (काऱ्हाटी) यांचे व्याख्यान,ह.भ.प.हरिश महाराज फडके (हातवळण) यांची कीर्तनसेवा,सरस्वती भजनी मंडळ काऱ्हाटी, मठबाबा भजनी मंडळ जळगाव सुपे,मोरया महिला भजनी मंडळ यांचा जागर होईल.सोमवार 16 मार्च रोजी सकाळी 8 ते 9 वाजता श्री पीरसाहेब महाराजांची मिरवणूक व दिंडी सोहळा,9.30 ते 11.30 वाजता ह.भ.प.वै.दशरथ तात्या महाराज जगताप,श्री दत्त मंडळ जुनी जेजुरी यांचे वतीने काल्याचे कीर्तन होईल.त्यानंतर पाहुण्यांचा सत्कार समारंभ व श्रींच्या महाप्रसादाचे भोजन होईल व कार्यक्रमाची सांगता होईल.

या सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन पीरसाहेब तरुण मंडळ मोरगाव,विश्व सामाजिक संस्था आळंदी देवाची, पीरसाहेब तरुण मंडळ, पिराचा मळा व समस्त ग्रामस्थ मंडळ पिराचा मळा,मोरगाव,ता.बारामती,जि.पुणे यांनी केले आहे. तरी आपण सर्वांनी या पवित्र कार्यक्रमास उपस्थित राहून हरिनामाचा लाभ घ्यावा.

# गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्यभर नियंत्रण कक्ष

मुंबई (दै. संध्या)

- जिल्हास्तरीय समित्या स्थापन
- गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध
- अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने
- राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही
- समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई
- अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन



इराण - इस्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठ्याबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल.

मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार असून मुंबई आणि ठाणे शहरातील सर्व उपायुक्तांशी सह पोलीस आयुक्त (प्रशासन) समन्वय साधणार आहेत.

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना देण्यात आले आहेत. यामध्ये कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच जिल्हास्तरीय समित्यांनी हॉटेल व रेस्टॉरंट संघटनांसोबत बैठक घेऊन पर्यायी इंधनाच्या वापरासाठी प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहेत.

अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, शासकीय शाळा/महाविद्यालयांमधील मेस, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना घरगुती/व्यावसायिक गॅसचा पुरवठा प्राधान्याने देण्यात येणार असून अशा संस्थांची यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने देण्यासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रमही निश्चित केला जाणार आहे.

गॅस पुरवठ्याबाबत अफवा पसरू नयेत, यासाठी दररोज रेडिओ, एफएम, दूरदर्शन तसेच मुद्रित माध्यमांद्वारे माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि जिल्हा समित्या यांसंदर्भातील जबाबदारी पार पाडतील समाज माध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे.

गॅस बुकींग ॲप आणि मिस्ड कॉल सेवांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याचे निर्देश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. तसेच राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने सुरू करून तक्रार निवारणासाठी व्हॉट्सॲप सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आगामी धार्मिक सण व उत्सवांचा विचार करून सार्वजनिक संस्थांना एलपीजी सिलिंडरचा पुरवठा अखंड ठेवण्यासाठी प्राधान्य राहील.

गॅस सिलिंडर पुरवठ्या संदर्भात नागरिकांमध्ये घबराट निर्माण होऊ नये, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत सदस्यांची मदत घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच गॅस एजन्सींना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासन, रेशनिंग नियंत्रक आणि तेल कंपन्यांनी दररोज साठा स्थिती व अद्ययावत अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात दररोज सरासरी सुमारे ९,००० मेट्रिक टन एलपीजी ची मागणी असते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी रिफायनरीमधील एलपीजी उत्पादन वाढविण्यात आले असून, गेल्या दोन दिवसांत दैनिक उत्पादन ९,००० मेट्रिक टनांवरून ११,००० मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यात घरगुती एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅसची मागणी पूर्ण करण्याइतके पुरेसे उत्पादन आणि साठा उपलब्ध आहे.

व्यावसायिक एलपीजीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रुग्णालये, शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा, सामुदायिक स्वयंपाकगृहे (कम्युनिटी किचन), तसेच शासकीय शाळा व महाविद्यालयांच्या मेस यांसारख्या अत्यावश्यक सेवांना प्राधान्य देण्यात येत आहे. उपलब्ध उत्पादनातून या सर्व गरजा पूर्ण होऊ शकतात. घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) चा देखील पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधनाच्या बाबतीतही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यातील रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज सुमारे १५,००० किलो लिटर पेट्रोल आणि ३८,००० किलो लिटर डिझेल या मागणीची पूर्तता केली जात आहे. त्यामुळे इंधन पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### 17 ते 20 मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

- शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे

मुंबई (दैनिक संध्या) : 17 ते 20 मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार 18 ते 20 मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

### जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्सला ट्रेडमार्क उल्लंघन प्रकरणात न्यायालयाचा मनाई हुकूम



मुंबई (दैनिक संध्या) : जेएसडब्ल्यू स्टीलची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि देशातील आघाडीच्या पोलाद उत्पादकांपैकी एक असलेल्या जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेडने आपल्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या व्यावसायिक विभागाकडून दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी एकतर्फी अंतरिम मनाई हुकूम मिळवला आहे. हा मनाई हुकूम रामलाल लखाजी देवासी (मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स व मेसर्स चामुंडा स्टील), हितेश देवासी (मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स) आणि बागदाराम लखारामजी देवासी (मेसर्स चामुंडा स्टील व आकाश स्टील पॉईंट) यांच्या विरोधात देण्यात आला आहे. संबंधित व्यापारी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील लासलगाव आणि मनमाड परिसरातून व्यवसाय करत असल्याचे समोर आले आहे. तपासात असे आढळून आले की प्रतिवादी जेएसडब्ल्यूच्या नोंदणीकृत ‘कलरऑन+’ आणि ‘विश्वास+’ या ब्रँडशी तंतोतंत जुळणारी किंवा फसव्या पद्धतीने साम्य असलेली चिन्हे वापरत होते. हे दोन्ही ब्रँड पोलाद उद्योगात व्यापक ओळख असलेले आहेत. जेएसडब्ल्यूने सादर केलेल्या प्राथमिक पुराव्यावर समाधान व्यक्त करत न्यायालयाने प्रतिवादींच्या परिसरात प्रवेश करून उल्लंघन करणारा माल, कागदपत्रे आणि साठा जप्त करण्याचे अधिकार देत न्यायालयीन रिसीव्हर नियुक्त करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी न्यायालयीन रिसीव्हरच्या पथकाने मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स, मेसर्स चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंट येथे यशस्वी कारवाई केली. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात बनावट किंवा उल्लंघन करणारा माल जप्त करून सील करण्यात आला. या कारवाईपूर्वी जेएसडब्ल्यूने लासलगाव आणि मनमाड पोलीस ठाण्यांमध्ये फौजदारी तक्रारीही दाखल केल्या होत्या. त्यानंतर जानेवारी २०२५ मध्ये पोलिसांनी छापे टाकून बनावट माल जप्त केला होता. जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्सने स्पष्ट केले की कंपनी आपल्या ट्रेडमार्क, लोगो आणि बौद्धिक संपदेच्या कोणत्याही अनधिकृत वापराचा तीव्र निषेध करते. कंपनीकडे मजबूत ब्रँड संरक्षण व्यवस्था असून बाजारातील बनावट उत्पादनांवर सतत लक्ष ठेवले जाते. उल्लंघन आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाते.

## आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनी Media Expo Mumbai 2026 मध्ये १४० हून अधिक प्रदर्शक

मुंबई (दै. संध्या)

इनडोअर आणि आऊटडोअर जाहिरात तसेच साईनेज सोल्यूशन्ससाठीची आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनी Media Expo Mumbai 2026 ची ५७ वी आवृत्ती ९ ते ११ एप्रिलदरम्यान बॉबे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात जागतिक आघाडीच्या ब्रँड्स आणि सर्जनशील व्यावसायिकांना एकत्र आणत भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे दर्शन घडवले जाणार आहे. मागील आवृत्त्यांच्या यशावर आधारित या वर्षीच्या प्रदर्शनात डिजिटल साईनेज तसेच पीओपी / पीओएसएम सोल्यूशन्सवर अधिक भर देण्यात येणार आहे. रिटेल, ब्रँडिंग आणि आउट-ऑफ-होम (ओओएच) माध्यमांमध्ये तंत्रज्ञानाधारित दृश्य संवादाची वाढती गरज लक्षात घेऊन ही दिशा निश्चित करण्यात आली आहे. उद्योगातील वाढत्या डिजिटल विस्ताराच्या पार्श्वभूमीवर बिलबोर्ड आणि आऊटडोअर जाहिरात क्षेत्रानेही भक्कम वाढ नोंदवली आहे. ग्रॅण्ड व्ह्यू रिसर्चच्या अहवालानुसार, भारतातील बिलबोर्ड आणि आऊटडोअर जाहिरात बाजाराने २०२५ मध्ये ५७६.३ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतका महसूल निर्माण केला असून, २०३३ पर्यंत हा आकडा १०७५.५ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. हा बाजार सुमारे ८.२ टक्के वार्षिक दराने वाढण्याचा अंदाज आहे. विशेषतः इमारत-आधारित जाहिरात हा विभाग सर्वाधिक महसूल निर्माण करणारा आणि जलद वाढणारा विभाग ठरला आहे. देशात सुरू असलेल्या मोठ्या पायाभूत प्रकल्पांमुळे तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) वाढत्या सहभागामुळे Media Expo Mumbai 2026 चे महत्त्व अधिक वाढले आहे. मेसे फ्रँकफुर्ट एशिया होल्डिंग्स लि. चे कार्यकारी संचालक व बोर्ड सदस्य राज मानेक म्हणाले की, Media Expo Mumbai 2026 हा उद्योगासाठी नव्या संधींच्या उंबरठ्यावर उभा आहे. साईनेज क्षेत्राने डिजिटल परिवर्तन स्वीकारले असून पर्यावरणपूरक आणि शाश्वत पद्धतींकडेही वळण घेतले आहे. प्रगत डिजिटल साईनेजपासून ते नाविन्यपूर्ण इन्टिरिअर-एक्स्टिरिअर डेकोर फॉरमॅट्सपर्यंत साईनेज आणि ओओएच मीडिया परिसंस्थेचा प्रभाव व उपयोगक्षेत्र सातत्याने वाढत आहे.”

## चुपा चुप्स कंपनीने क्रेझी रॅफे नावाची लांब, ट्विस्टेड जेली आणली बाजारात ज्यामुळे मिळणार मजेशीर खाण्याचा आनंद येणार परत

मुंबई (दै. संध्या)

- मजेदार आणि चवदार कँडी खायला आवडणाऱ्या किशोरवयीन मुलांसाठी खास बनवलेली




परफेट्टी व्हॅन मेल्ले कंपनीचा कन्फेक्शनरी ब्रँड चुपा चुप्सने क्रेझी रॅफे नावाची नवीन जेली बाजारात आणली आहे, ही जेली लांब, वाकडी-तिरपी असून आतमध्ये फिलिंग आहे, त्यामुळे रोजच्या स्नॅकिंगला मजेशीर ट्विस्ट मिळतो, दिसायला वेगळी आणि मजेदार असल्यामुळे किशोरवयीन आणि लहान मुलांसाठी खास तयार केली आहे. 30 ग्रॅ वजनाची ही जेली ₹20 ला मिळते.

क्रेझी रॅफे तयार करताना एक साधी पण महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली. आजची तरुण पिढी फक्त चव बघत नाही. त्यांना दिसायला मजेदार, खेळता येईल अशी आणि मित्रांसोबत शेअर करता येईल अशी कँडी आवडते. रोजच्या क्षणांत थोडी मजा आणि उत्सुकता आणणारे स्नॅक्स त्यांना हवे असतात. लांब आणि वाकडी-तिरपी आकाराची जेली आणि जिराफपासून प्रेरित डिझाइनमुळे क्रेझी रॅफे साध्या कँडीला मजेशीर अनुभव देते.

या जेलीच्या बाहेर स्ट्रॉबेरी चवीचे कव्हर आहे, जे लाल रंगाच्या 2 छटांमध्ये दिसते, आतमध्ये क्रीमी व्हॅनिला फिलिंग आहे. आंबट आणि गोड चव एकत्र आल्यामुळे खाण्याचा वेगळा अनुभव मिळतो, लांब आणि वाकडी-तिरपी आकारामुळे ही जेली ताणून खाणे, मित्रांसोबत शेअर करणे आणि मज्जा घेत घेत खाणे सोपे होते. ब्रेकमध्ये किंवा मित्रांसोबत गप्पा मारताना क्रेझी रॅफे खाण्यात वेगळी मजा देते. परफेट्टी व्हॅन मेल्ले इंडियाच्या मार्केटिंग विभागाच्या संचालिक गुंजन खेतान या नवीन सुरुवातीबद्दल बोलतांना म्हणाल्या, "चुपा चुप्स हा ब्रँड क्रिएटिव्हिटी, स्वतःची ओळख आणि मजा यासाठी ओळखला जातो. क्रेझी रॅफेमधून आजच्या किशोरवयीन मुलांसाठी काहीतरी नवीन, मजेदार आणि खेळकर फॉरमॅट देण्याचा प्रयत्न केला आहे. ही फक्त चवीसाठी नाही, तर रोजच्या क्षणांना थोडी मजा आणि वेगळा अनुभव देण्यासाठी आहे. लांब वाकडी-तिकडी जेली आणि आतले फिलिंग यामुळे खाण्यात छोटा सरप्राइज मिळतो. त्यामुळे जेली प्रकारात पुन्हा उत्सुकता आणि चर्चा वाढेल अशी अपेक्षा आहे." जिराफपासून प्रेरित पॅकेजिंगमुळे या प्रॉडक्टचा लूक आणखी वेगळा दिसतो, त्यामुळे दुकानाच्या शेल्फवर तो लगेच लक्ष वेधून घेतो. लांब आणि आकर्षक डिझाइनमधून ब्रँडचा अनुभव देण्याचा विचार दिसतो तसेच तरुण ग्राहकांनी रोजच्या छोट्या क्षणांत थोडी मजा आणि आनंद घ्यावा, असा संदेश यातून दिला आहे. भारतामध्ये कन्फेक्शनरी बाजार सतत बदलत आहे, आता लोकांना फक्त चव नाही, तर मजा देणारे आणि वेगळा अनुभव देणारे स्नॅक्सही आवडत आहेत. चुपा चुप्सने क्रेझी रॅफेमधून तरुणांना आवडेल असा नवीन आणि वेगळी कँडी अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे. क्रेझी रॅफेची सुरुवात फेब्रुवारी 2026 मध्ये झाली. सध्या ही जेली भारतभरच्या दुकानांमध्ये ₹20 प्रति पॅक दराने मिळत आहे.

## *अध्यक्षांवरील हल्ला हा राहुल गांधींचे अपयश झाकण्याचा काँग्रेसचा प्रयत्न?*

मुंबई (दै. संध्या)




लोकसभेच्या अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्तावावर चर्चा होण्याचा दिवस आला तेव्हा संसदेतले वातावरण आधीपासूनच तापलेले होते. मात्र जसेच राजकारणातील कुशल रणनीतीकार म्हणून ओळखले जाणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा बोलण्यासाठी उभे राहिले, तसे काही क्षणांसाठी संपूर्ण सभागृह शांत झाल्यासारखे वाटले. कारण संसदीय राजकारणाचे बारकाईने निरीक्षण करणाऱ्यांना ठाऊक आहे की, जेव्हा अमित शहा बोलतात तेव्हा ती चर्चा केवळ औपचारिक राहत नाही; तर ती युक्तिवाद, वस्तुस्थिती आणि राजकीय संदेशांचा प्रभावी संगम ठरते. त्या दिवशी चर्चेचा विषय होता लोकसभा अध्यक्षांविरुद्ध आणलेला अविश्वास प्रस्ताव. जवळपास चार दशकांनंतर असा प्रस्ताव सभागृहात मांडला गेला होता. देशातील सर्वात मोठे लोकशाही व्यासपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकसभेत अशा प्रकारची घटना घडणे हे नक्कीच असाधारण मानले जाते. ही चर्चा जवळजवळ तेरा तास चालली. या कालावधीत चाळीसहून अधिक खासदारांनी आपली मते मांडली. अखेरीस हा प्रस्ताव ध्वनी मताने फेटाळण्यात आला. मात्र चर्चा जसजशी पुढे सरकत गेली, तसतसे अनेक खासदार आणि राजकीय विश्लेषकांच्या मनात एक प्रश्न वारंवार उमटत राहिला — हा खरोखर अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा मुद्दा होता की मुख्य विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना प्रभावी खासदार म्हणून स्वतःला सिद्ध करण्यात आलेले अपयश झाकण्याचा हा प्रयत्न होता? संसदेत प्रभावी खासदार म्हणून काम करण्यासाठी केवळ राजकीय लोकप्रियता पुरेशी नसते. त्यासाठी संसदीय नियमांची जाण, चर्चेत सातत्याने सहभाग आणि सभागृहात नियमित उपस्थिती असणे अत्यंत आवश्यक असते. या बाबतीत अनेकदा अमित शहा यांचे उदाहरण दिले जाते. महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची वेळ येते तेव्हा अनेकदा राहुल गांधी परदेश दौऱ्यावर असल्याचे राजकीय वर्तुळात नमूद केले जाते. कधी जर्मनी, कधी व्हिएतनाम, कधी युनायटेड किंग्डम, तर कधी सिंगापूर आणि मलेशिया अशा दौऱ्यांचा उल्लेख वारंवार केला जातो. त्यानंतर त्यांना बोलण्याची संधी मिळत नाही अशी तक्रार केली जाते. त्यामुळे स्वाभाविकच असा प्रश्न उपस्थित होतो की, जर एखादा खासदार त्या वेळी सभागृहात उपस्थित नसेल, तर तो चर्चेत कसा सहभागी होणार?

म्हणूनच त्या दिवशीच्या चर्चेदरम्यान काही सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की अध्यक्षांवर केलेली टीका ही कदाचित प्रभावी संसदीय कामगिरी करण्यात अपयशी ठरल्यामुळे निर्माण झालेली राजकीय अस्वस्थता झाकण्याचा प्रयत्न असू शकतो. चर्चेदरम्यान आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला — संसदेचे नियम आणि परंपरा. लोकसभा कोणत्याही राजकीय मेळाव्यासारखी चालत नाही. येथे प्रत्येक सदस्याने ठरलेल्या प्रक्रियेप्रमाणे आणि नियमांनुसारच बोलावे लागते. लोकसभेच्या नियमांनुसार, सभागृहात गोंधळ घालणे, शिस्तभंग करणे किंवा असंसदीय शब्दांचा वापर करणे यावर अध्यक्षांना कारवाई करण्याचा अधिकार आहे. सदस्याला इशारा देणे, त्याचे नाव घेऊन कारवाई करणे, सभागृहातून बाहेर काढणे किंवा निलंबित करणे अशी अधिकार व्यवस्था नियमांमध्ये स्पष्टपणे नमूद आहे. म्हणूनच संसदीय लोकशाहीत अध्यक्षांना केवळ अध्यक्षीय अधिकारी नव्हे, तर सभागृहाचे संरक्षक मानले जाते.

त्या दिवशीही हा संदेश स्पष्टपणे समोर आला — संसद ही काही जत्रा नाही. जो नियमांचे पालन करणार नाही, त्याचा आवाज बंद होऊ शकतो आणि त्याला सभागृहाबाहेरही जावे लागू शकते. संसदीय इतिहासात अध्यक्षांच्या पदाला नेहमीच पक्षीय राजकारणापेक्षा वरचे स्थान दिले गेले आहे. भारतीय संसदेची विश्वासार्हता आणि लोकशाही परंपरा याच संतुलनावर टिकून आहेत. त्यामुळे अध्यक्षांच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित झाले तर त्याचा परिणाम केवळ संसदेत मर्यादित राहत नाही.

# स्मार्ट मॉर्निंग न्यूट्रिशनच्या शक्तीने आपली इम्युनिटी मजबूत करा

शीला कृष्णास्वामी, न्यूट्रिशन आणि वेलनेस कंसल्टंट

मुंबई (दै. संध्या)

हंगामी विषाणूजन्य संसर्ग हवामान बदलाच्या काळात उच्चतम स्तरावर पोहोचतात, त्यामुळे आपल्या रोगप्रतिकारक शक्तीला बळकट करणे अत्यावश्यक आहे. सर्दी, फ्लू, आणि इतर श्वसन आजार या परिस्थितीत वाढतात, त्यामुळे दिवसाच्या सुरुवातीपासून पोषक अन्नासह आपल्या शरीराला समर्थन देणे महत्त्वपूर्ण फरक निर्माण करू शकते. एक चांगले संतुलित सकाळचे रूटीन आपल्या रोगप्रतिकारक शक्तीला प्रभावीपणे कार्य करण्यासाठी आवश्यक मूलभूत समर्थन प्रदान करू शकते. बदाम, अंडी, संत्रीजन्य फळे, फर्मेंटेड अन्नपदार्थ, संपूर्ण धान्ये यासारखे अन्न दिवसाच्या सुरुवातीस समाविष्ट केल्यास ऊर्जा आणि महत्त्वपूर्ण सूक्ष्म पोषक घटक मिळतात जे रोगप्रतिकारक कार्याला समर्थन देतात आणि दाह कमी करतात. सकाळच्या जेवणात समाविष्ट करण्यासाठी येथे चार सोपे पर्याय आहेत.



बदाम : बदाम हे १५ पोषक घटकांचे स्रोत आहेत, ज्यात व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रथिन, रिबोफ्लेविन, आणि झिंक यांचा समावेश आहे. हे घटक एकत्रितपणे अँटीऑक्सिडंट क्रियाशीलता आणि रोगप्रतिकारक पेशींच्या कार्याला समर्थन देतात. दिवसाची पौष्टिक सुरुवात करण्यासाठी त्यांना पोरीज किंवा दहीमध्ये घालावे किंवा जसे आहेत तसे खाल्ले पाहिजे.

अंडी : अंडी उच्च प्रतीचे प्रथिन तसेच व्हिटॅमिन डी आणि इतर पोषक घटक प्रदान करतात, जे रोगप्रतिकारक नियंत्रण, टी-सेल क्रियाशीलता आणि अनेक इतर कार्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांचा आनंद उकडून, पोच करून किंवा स्पिनॅच आणि संपूर्ण गव्हाच्या टोस्टसह स्क्रॅम्बल करून घेता येतो, ज्यामुळे सकाळचे जेवण संपूर्ण आणि पौष्टिक बनते.

संत्र्याचे फळे : संत्रा, ग्रेपफळ आणि मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी असते, जे रोगप्रतिकारक शक्तीला समर्थन देते आणि शक्तिशाली अँटीऑक्सिडंट म्हणून कार्य करते. ही जोडी आपल्या शरीराच्या हानिकारक सूक्ष्मजीवांविरुद्धच्या पहिल्या संरक्षणाची ताकद वाढवते. त्यांचा आनंद संपूर्ण फळ म्हणून किंवा पाण्यात घालून ताजेतवाने बूस्ट मिळवण्यासाठी घेता येतो. संत्र्याच्या फळांशिवाय, आवळा आणि पेरू यामध्येही व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. जेव्हा शक्य असेल तेव्हा त्यांचा आनंद घ्या.

फर्मेंटेड अन्नपदार्थ : आरोग्यदायी गट माइक्रोबायोम रोगप्रतिकारक शक्ती बळकट करण्यास आणि शरीराच्या संसर्गाविरुद्ध लढण्याच्या क्षमतेला सुधारण्यास महत्त्वाची भूमिका बजावतो. दही, सकाळचे पदार्थ जसे ढोकळा, इडली, डोसा, फर्मेंटेड तांदळाचा पोरीज इत्यादी समाविष्ट केल्यास सकाळी गटास अनुकूल बॅक्टेरियाची वाढ होते.

सकाळच्या आहारात हे अन्नप्रकार प्राधान्याने समाविष्ट केल्यास हंगामी रोगांविरुद्ध प्रतिकारशक्ती तयार होते. सातत्य महत्वाचे आहे, आणि या पर्यायांसह पुरेशी झोप, संतुलित जेवण आणि योग्य हायड्रेशन जोडल्यास एकूण आरोग्यास अधिक समर्थन मिळते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्वराज्य शासन व साजिर प्रतिष्ठानतर्फे स्त्रीशक्ती पुरस्कार सोहळा

पुणे (दैनिक संध्या) : स्वराज्य शासन आणि साजिर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा 'स्त्रीशक्ती पुरस्कार' सोहळा उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम पुणे येथील घोले रोड क्षेत्रीय कार्यालयातील पं. जवाहरलाल नेहरू सभागृहात आयोजित करण्यात आला होता. समाज कल्याण विभाग, पुणे येथील सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे आणि नगरसेविका पल्लवी जावळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खडकवासला पाटबंधारे विभागाचे माजी कार्यकारी अभियंता पांडुरंग शेलार उपस्थित होते. यावेळी बोलताना पांडुरंग शेलार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री सक्षमीकरणासाठीच्या योगदानाचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना सन्मान आणि समान हक्क मिळवून देण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. स्त्रियांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल मांडले तसेच भारतीय संविधानामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क प्रदान केले. तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातल्याचेही शेलार यांनी आपल्या भाषणात नमूद केले. या कार्यक्रमाला दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुखदेव तात्या सोनवणे, स्वराज्य शासन संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा उज्वला ताई भोसले, मयूर घारे तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### जुन्नर तालुक्यातील टोमॅटो उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील टोमॅटो उत्पादक शेतकरी टोमॅटोला मिळणाऱ्या कमी दरामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. सध्या टोमॅटोच्या प्रतिकॅरेटला 200 ते 250 रुपये भाव मिळत आहेत. मात्र या टोमॅटोच्या लागवडीसाठी शेत मशागत, रोपे,तार, बांबू, खते, औषधे, तोडणी मजुरी हा एकरी सव्वा लाख रुपये खर्च येत आहे. शेतकरी कर्ज काढून टोमॅटोची लागवड करत आहेत. मात्र प्रतिकॅरेटला 200 ते 250 रुपये सध्या भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्याने आतापर्यंत घातलेले भांडवल हे परत मिळेल की नाही,अशी चिंता व्यक्त होत आहे. टोमॅटो उत्पादक शेतकरी वारूळवाडीचे उपसरपंच प्रकाश भालेराव यांनी सांगितले की, सध्या उन्हाची ताप पडत असल्यामुळे बाजारात मिडीयम व छोटा माल अधिक प्रमाणात येत असल्याने अपेक्षित दर मिळत नाहीत. किमान 300 रुपये प्रति कॅरेट दर मिळाला असता तरी भांडवल वसूल झाले असते, अशी खंत त्यांनी व्यक्त करून सध्या टोमॅटो उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे त्यांनी सांगितले.

### राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

जुन्नर(दैनिक संध्या) : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालय व जिल्हयातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असून, जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर येथे देखील या राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या पक्षकारांना आपली प्रकरणे या लोकअदालतीत ठेवायची आहेत त्यांनी न्यायालयाशी किंवा जुन्नर तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा व जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर येथे आयोजित केलेल्या या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हा न्यायाधीश जुन्नर तथा तालुका विधि सेवा समिती जुन्नरचे अध्यक्ष मा. श्री. एस. बी.शेलार साहेब यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे. जुन्नर तालुक्यातील दाखलपुर्व व प्रलंबित प्रकरणांचा लवकरात लवकर आणि सामंजस्याने निपटारा करण्यासाठी या राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे या लोकअदालतीमध्ये (Pre-litigation) दाखलपूर्व प्रकरणे विज व पाणी बिल देयके, बँक कर्ज वसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावे, कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, कर्मचारी नुकसान भरपाई प्रकरणे व इतर दिवाणी व फौजदारी तडजोड योग्य प्रकरणे या राष्ट्रीय लोकन्यायालयात निकाली काढले जातात लोकअदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे निकाली निघाल्यामुळे दोन्ही पक्षांचा विजय होतो झालेल्या निर्णयानुसार न्यायालयीन फिस पक्षकाराला परत मिळते पक्षकारांच्या वेळेची बचत, कमी खर्च व त्वरीत न्याय मिळतो.



### चाकणला माणसातला देव माणूस स्व. किरणशेठ मांजरे यांना अभिवादन

चाकण (दैनिक संध्या) : माणसातला देव माणूस व अनेक संस्थांवर अधिराज्य गाजविणारे आणि जनतेच्या हितासाठी बहुजनांना न्याय देण्याकरता सदैव निस्वार्थीपणे काम करणारे येथील राजगुरुनगर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व महावीर पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. किरणशेठ मांजरे यांना त्यांच्या जयंतीनिमित्त चाकण मधील विविध सेवाभावी संस्था व संघटनांनी मांजरे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना विनम्रपणे अभिवादन केले. स्व. किरणशेठ मांजरे यांच्या स्मृती अनेक संस्थांच्या माध्यमातून समाजात आजही जिवंत आहेत. चाकण येथे किरणशेठ मांजरे यांच्या जयंतीनिमित्त उद्योजक बाळासाहेब मांजरे व समाज प्रबोधनकार व वारकरी संप्रदायाचे भूषण हभप. मुक्ताजी महाराज नाणेकर यांच्या हस्ते किरणशेठ यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी आपत्ती व्यवस्था प्रमुख शांताराम गाडे, जैन कॉन्फरन्सचे सदस्य मनीष गुगळे, दोस्ताना ग्रुपचे अध्यक्ष हनुमंत मेदनकर, उद्योजक भवरलालजी हेडिया, उद्योजक धीरजजी कासवा, रोशन चोरडिया, संतोष बारणे, शैलेश शहा, दीपक गायकवाड, धोंडी भाऊ राक्षे, उद्योजक देवराम सोनवणे, नंदकुमार अभंग, लक्ष्मण नाणेकर, संतोष जगताप, आप्पासाहेब पोतेकर, शशिकांत लष्करे, सत्यवान गोरे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्योजक बाळासाहेब मांजरे यावेळी म्हणाले, " किरणशेठ मांजरे यांनी गोरगरीब व बहुजनांच्या आर्थिक संकटांना दिलासा देण्यासाठी महावीर नागरी पतसंस्थेची स्थापना केली. सदरच्या पतसंस्थेच्या माध्यमातून अनेक सभासद बंधू भगिनींचे व्यवसाय वृद्धिंगत झाले. अशा माणसातल्या देव माणसाला जयंती निमित्त विनम्र अभिवादन करत आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. किरणशेठ मांजरे यांच्या कार्याचा गौरव करून आदरांजली वाहिली.

# जेजुरीत महिलांचा सन्मान



**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी शहरातील जयमल्हार जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा सन्मान करण्यात आला. जेजुरी जयमल्हार जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्यामकाका पेशवे यांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ नागरिक भवनात जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना साड्यांचे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने वर्षभर गुणवंत विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्ती यांचा पुरस्कार देवून सन्मान, जेष्ठ नागरिकांसाठी धार्मिक सहली, आरोग्य शिबिरे, व्याख्याने,वाढदिवस, जागतिक महिला दीन, राष्ट्रीय सण, आदी उपक्रम राबविले जातात. जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या सदस्या,तसेच महिला नगरसेविका, शहरातील महिलांचा सन्मान करून त्यांचा आदर करून त्यांना प्रतिष्ठा देण्याचे काम संघ करीत आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांनी जेजुरीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन अध्यक्ष श्यामकाका पेशवे यांनी केले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या सदस्या डॉ प्राजक्ता दुर्गाडे,भाजपाच्या पदाधिकारी अलका शिंदे,सामाजिक कार्यकर्त्या मीनल बारभाई, जेजुरी नगरपरिषदेच्या नगरसेविका अमिना पानसरे,मोनिका घाडगे, प्रियंका देशमुख,नीलम सातभाई,भक्ती कोरपड,स्नेहल भालेराव,मेघा उबाळे ,मंदा बयास आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन संघाचे पदाधिकारी हरिश्चंद्र कोरपड, सुहास बारभाई, हरिश्चंद्र कराळे, अनंत जगताप, नंदकुमार निरगुडे, मोहिनी धोत्रे यांनी केले.



## दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत पथदिवे बसविण्याच्या कामांचा शुभारंभ

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत आनंदनगर मुख्य चौक ते सोनवणे घर आदी सुमारे २किलो मीटर परिसरामध्ये पथदिवे उभारण्यास प्रारंभ करण्यात आला . शुक्रवारी ( दि.१३) या कामांचा शुभारंभ करताना नगरसेविका स्नेहल भालेराव , मेघा उबाळे , स्वरूपा खोमणे , नगरसेवक कृष्णा कुदळे , योगेश जगताप ,शिवाजी जगताप, सत्यवान उबाळे ,गौतम भालेराव , सुशील राऊत , ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे ,जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष तानाजी जगताप , सुरेश उबाळे , आदी उपस्थित होते . सुमारे ७५ लक्ष रुपयांचे हे काम असून यामध्ये ९१ पथदिवे उभारण्यात येणार आहेत. एटीएस इलेक्ट्रिक या कंपनीला हे काम देण्यात आलेले आहे. तसेच त्यांच्याकडून ३ वर्षांची गॅरंटी घेण्यात आलेली आहे. पुढील काळात जेजुरी शहराच्या मुख्य चौकात सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याचे नगरसेवक योगेश जगताप यांनी सांगितले आभार पंढरीनाथ जाधव यांनी मानले.




■ भोंडवेवाडी येथे शेतकऱ्यांना मोबाईलवरील कृषी ॲप्सचा वापर कसा करावा, याची माहिती देताना डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत ■

# शेतकऱ्यांना 'कृषी मार्केटिंग ॲप्स'चे धडे

**सासवड (दै. संध्या)**

डॉ. शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाच्या कृषिदूतांनी 'ग्रामीण कृषी कार्यानुभव' कार्यक्रमांतर्गत भोंडवेवाडी येथे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत विविध कृषी मार्केटिंग मोबाईल ॲप्सबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आजच्या धावपळीच्या युगात शेतकऱ्यांनी केवळ उत्पादनावर लक्ष न देता विपणन (Marketing) आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे काळाची गरज बनली आहे. या उपक्रमात 'कृषिक', 'बिगहाट' आणि "भारतॲग्रो' यांसारख्या विविध भ्रमणध्वनी प्रणालींचा (मोबाईल ॲप्स) प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

या ॲप्सच्या माध्यमातून शेतकरी घरबसल्या दर्जेदार बियाणे, खते, कीडनाशके तसेच शेतीसाठी लागणारी आधुनिक अवजारे रास्त दरात खरेदी करू शकतात. तसेच, विविध बाजारपेठांमधील चालू बाजारभाव तपासणे आणि कृषी साहित्य घरपोच मिळवणे आता सोपे झाले आहे. "डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर केल्यास मध्यस्थांची साखळी कमी होऊन शेतकऱ्यांच्या वेळ आणि खर्चात मोठी बचत होईल," असे कृषिदूतांनी यावेळी सांगितले.

या मार्गदर्शनात कृषिदूत तुषार किरी, विवेक पाटील, मुकुल पाटील, शिवराज कदम, अनुज जगताप आणि मुकुल गावली यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. त्यांनी शेतकऱ्यांच्या भ्रमणध्वनीवर ही ॲप्स डाऊनलोड करून देऊन नोंदणी प्रक्रिया समजावून सांगितली. या उपक्रमामुळे भोंडवेवाडीतील शेतकऱ्यांमध्ये डिजिटल व्यवहारांबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार



**पिंपरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ,पुणे गट कार्यालया अंतर्गत कामगार कल्याण केंद्र, उद्योग नगर,चिंचवड येथे,जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान कामगार महिलांचा सत्कार समारंभ मंगळवार दिनांक १० मार्च रोजी सायं ४:०० वा आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे- मा.शारदाताई मुंडे(समाजप्रबोधनकार), स्वानंद राजपाठक.आरोग्य व रुग्ण मित्र (गुणवंत कामगार) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष- प्रा. डॉ. नितांताई मोहिते (सिनेट सदस्या,सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. अपर्णा नितीन शितोळे ,श्रध्दा सरकार हर्षाली दिलीप पाटील सुप्रिया विठ्ठले श्वेता रोहित मोरे विजयमाला सायास केकाण मनिषा भुषण पाटील यांस सन्मानचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी कामगार भूषण डॉक्टर मोहन गायकवाड, गुणवंत कामगार सुदाम शिंदे,राजेश हजारे,शंकर नाणेकर,शिवराज शिंदे,,महमंदशरीफ मुलाणी प्रकाश चव्हाण,संदीप रांगोळे तसेच कमलिनी जगताप,महेंद्र गायकवाड,राजेश गाढवे, पांडुरंग सुतार,राहुल पाटील,मुस्तफा मुलाणी,शंकर देशमुख,प्रशांत घोरपडे ,हेमंत पवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व स्वागत मनोज पाटील ( प्र.सहा. कल्याण आयुक्त पुणे ) यांनी केले.तसेच सूत्रसंचलन सुनिल बोरावडे (केंद्र संचालक) यांनी केले,तर आभार प्रदीप बोररसे( केंद्र संचालक,उद्योग नगर,चिंचवड)* यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता संदीप गावडे, अनिल कारळे, अश्विनी दहितुले, रूपाली मुळीक, शुभांगी नावडीकर,उज्वला अवघडे प्रतिभा येरम,माया कदम सुहास भोसले,शंकर शेलार, भास्कर मुंडे, सतीश चव्हाण यांनी संयोजन केले केली.

## इंदू-गीत बहिणींनी प्रथमच ऐकली आई-बाबांची हाक

**पुणे (दै. संध्या)**

देहूरस्ता परिसरात कंपनीत कामगार म्हणून काम करणारे मल्लेश कानडे यांना 'इंदू' ही पहिली मुलगी झाली तेव्हा कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. मात्र, ती कितीही बोलले तरी प्रतिसाद देत नसल्याचे लक्षात आले. दीड वर्षांनी तपासणी केली असता इंदू मूकबधिर असल्याचे स्पष्ट झाले. डॉक्टरांनी कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी सुमारे दहा लाख रुपये खर्च सांगितल्याने महिन्याला १३ हजार रुपये पगार असलेल्या कानडे कुटुंबीयांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले. यानंतर दोन वर्षांनी त्यांना 'गीत' ही दुसरी मुलगी झाली. दुर्दैवाने तीही मूकबधिर असल्याचे समोर आले. दोन्ही मुली ऐकू किंवा बोलू शकत नसल्याने कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला.

मात्र या कुटुंबाला आधार मिळाला तो राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) या योजनेचा. या कार्यक्रमातील वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनामुळे एका मुलीची शस्त्रक्रिया आरबीएसके अंतर्गत तर दुसऱ्या मुलीची शस्त्रक्रिया मुख्यमंत्री सहायता निधीतून करण्यात आली. गेल्या महिन्यात दोन्ही मुलींवर मोफत कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्यांनी प्रथमच आई-वडिलांचा आवाज ऐकला.

# महिला पोलिसांचा सन्मान आणि 'टिफिन डबा' वाटप उपक्रम

**पोलीस मित्र सेवा मंडळाचा येरवडा व लोहगाव येथे स्तुत्य उपक्रम**

**पुणे (दै. संध्या)**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ११ मार्च २०२६ रोजी पोलीस मित्र सेवा मंडळाच्या वतीने महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. येरवडा खुले कारागृह आणि लोहगाव पोलीस स्टेशन येथे कार्यरत महिला पोलिसांना ड्युटीवर असताना जेवणाची सोय व्हावी, या हेतूने मंडळाचे महाराष्ट्र राज्य सचिव सुमित दरंदले यांच्या उपस्थितीत 'टिफिन डबा' (जेवणाचे डबे) वाटप करून त्यांचा गौरव करण्यात आला. येरवडा खुल्या कारागृहात आयोजित कार्यक्रमाला कारागृह अधीक्षक श्री शामकांत शेडगे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



याप्रसंगी बोलताना मंडळाचे पुणे शहराध्यक्ष रामदास गवते म्हणाले की, "पोलीस दलात काम करताना कौटुंबिक जबाबदारी आणि कर्तव्य यांचा समन्वय साधणाऱ्या महिला कर्मचारी खऱ्या अर्थाने समाजाच्या आधारस्तंभ आहेत. त्यांच्या या निष्ठेला सलाम करण्यासाठी हा छोटासा उपक्रम आम्ही राबवला आहे." कार्यक्रमाचा दुसरा टप्पा लोहगाव पोलीस स्टेशन येथे संपन्न झाला. येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ मनीषा पाटील यांच्या उपस्थितीत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. ड्युटीच्या व्यापात अनेकदा जेवणाकडे दुर्लक्ष होते, अशा वेळी हा टिफिन डबा महिला कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. अश्विनी टाक यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस सेवा मंडळाचे सुमित दरंदले,रामदास गवते, अश्विनी टाक, रुची गर्ग, हर्षल कोरडे व इतर पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. महिला दिनानिमित्त राबवण्यात आलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे पोलीस प्रशासनाकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# शेतकरी कल्याणाच्यादृष्टीने सामूहिक काम करुया - सुनेत्रा पवार

**उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते रयत भवन शेतकरी मॉलच्या इमारतीची पायाभरणी**

**बारामती (दै. संध्या)**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती नेहमीच शेतकरी हित व कल्याणाचा विचार करुन काम करीत आलेली आहे; आगामी काळातही देशातील सर्वोत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती बनविण्यासोबत शेतकऱ्यांच्या हितासाठी सामूहिक जबाबदारीने काम करुया, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. तसेच नुतून रयत भवन शेतकरी मॉलमुळे बारामतीच्या विकासात नवे परिणाम, शेतकऱ्यांना विविध संधी मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रयत भवन शेतकरी मॉलच्या पायाभरणी समारंभप्रसंगी त्या बोलत होते. यावेळी उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, पंचायत समितीचे सभापती किरण तावरे, नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विनायक गावडे, उप सभापती अरुण सकट, संचालक मंडळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीला सुमारे ९० वर्षांची परंपरा आहे. शेतकरी वर्गाला केंद्रबिंदू मानून पारदर्शक व्यवहार, शेतमालाचे अचूक वजन, त्वरित पट्टी देण्याची व्यवस्था, ई-नाम द्वारे ऑनलाईन लिलाव आणि संगणकीकृत व्यवहार अशापद्धतीने अतिशय उत्तम काम करीत आहे. राज्यातील ३०० हुन अधिक बाजार समित्यांमध्ये बारामती बाजार समितीने प्रथम क्रमांक मिळवून आदर्श बाजार समिती म्हणून ओळख निर्माण केली आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. बारामती परिसरातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन नाविन्यपूर्ण प्रयोग शेतीमध्ये राबवितात.त्यामुळे या परिसराची ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेली आहे.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जळोची कृषी उत्पन्न बाजार समिती येथे शीतगृह, ग्रेडिंग, पॅकींग, निर्यात सुविधा केंद्र, रेशीम कोशाचे ई-नामद्वारे लिलाव सुविधामुळे शेतमालाला अधिकचा भाव मिळण्यास मदत होणार आहे. रेशीम कोशासाठी ई-नामद्वारे लिलाव सुरु करुन देशापुढे आदर्श निर्माण केला आहे.

नवीन रयत भवन शेतकरी मॉलमुळे शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना एकाच ठिकाणी आधुनिक पद्धतीने सेवा मिळणार आहे. भाडे उत्पन्नापोटी मिळणाऱ्या दोन कोटी रुपयामुळे समितीची आर्थिक क्षमता बळकट होण्यास मदत होणार आहे. आगामी काळात या निधीचा उपयोग शेतकरी व बाजार घटकासाठी अधिक सुविधा निर्माण करण्यात येईल, संचालक मंडळाच्यावतीने करण्यात आलेल्या सूचनांवर सकारात्मक पद्धतीने विचार करण्यात येईल, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

श्री. तावरे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आग्रही होते. त्यांच्या स्वप्नातील बारामती घडविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करुया, असेही श्री. तावरे म्हणाले. श्री. गावडे यांनी प्रास्तविकात नव्याने उभारण्यात येणाऱ्या शेतकरी मॉलमध्ये करण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती दिली. या शेतकरी मॉलला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याबाबत संचालक मंडळाच्यावतीने सूचना केली.